cmyk

## संपादकीय

### महाकुंभात अग्नितांडव!

प्रयागराज येथे १३ जानेवारी ते २६ फेब्रुवारी दरम्यानच्या महाकुंभ मेळ्याला शाही प्रारंभ झाला आहे. या महाकुंभ मेळ्याची तयारी उत्तर प्रदेश प्रशासनाने उत्तम प्रकारे केली आहे. महाकुंभाला येणा–या भाविकांची कोणतीही गैरसोय होऊ नये म्हणून विशेष उपाययोजना करण्यात आल्या आहेत. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी जातीने महाकुंभाच्या तयारीचा आढावा घेतला होता. या पवित्र धार्मिक सोहळ्यामुळे उत्तर प्रदेशच्या तिजोरीत सुमारे २ लाख कोटी रुपये जमा होणार आहेत. या महाकुंभाला ४० ते ४५ कोटी भाविक येण्याची शक्यता आहे.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com







बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२७२ | गुरूवार, दि.२३ जानेवारी २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये

# पिक विम्यातील बोगसगिरीवर हातोडा

## बोगस पीक विमा रद्द, कृषी विभागाची धडक कारवाई

मुंबई । प्रतिनिधी

गेल्या महिनाभरापासून राज्यातील बोगस पिक विम्याचे प्रकरण गाजत आहे. नाशिक जिल्ह्यात कांदा पिकाचा बोगस विमा उतरवला असल्याचे उघड झाले तसेच आ. सुरेश धस यांनी परळीत बोगस पिकविम्याचे रॅकेट असल्याचे म्हटले होते. अधिवेशनात हा मुद्दा गाजल्यानंतर याबाबत चौकशी होऊन समितीने एक रुपयात पिक विमा बंद करण्याची शिफारस सरकारकडे केली. त्यानंतर राज्य सरकारच्या कृषी विभागाने मोठे पाऊल उचलत बोगस पिक



विमा उतरवलेल्या शेतकऱ्यांचा विमा रद्द करण्याची सूचना दिली आहे.

खरीप हंगामात शेतकऱ्यांनी पीक लागवड न करता पिक विमा उतरवल्याचा निदर्शनास आले होते. यामध्ये कांदा उत्पादक शेतकऱ्यांचा आकडा सर्वाधिक मोठा होता. नाशिक जिल्ह्यात ५१७२ शेतकऱ्यांनी ३६०० हेक्टर क्षेत्रावर बोगस पिक विमा उतरला होता. बोगस पीक विमा प्रकरणात कृषी विभागाने नाशिक जिल्ह्यातील ५१७२ शेतकऱ्यांवर ठपका ठेवला आहे. त्यांनी ३६०० हेक्टर क्षेत्रावर बोगस पिक विमा उतरला होता. कृषी विभागाने विमा कंपन्यांना बोगस पिक विमा उतरवल्या शेतकऱ्यांचा विमा रद्द करण्याचा निर्णय घेतला आहे. बोगस पिक विमा उतरवलेल्या शेतकऱ्यांचा विमा रद्द करण्यात आल्याची माहिती नाशिकचे उपसंचालक कृषी अधिकाऱ्यांनी दिला आहे. कृषी विभागाच्या पडताळणीनंतर सरकारच्या तिजोरीचा कोट्यवधी रूपयांचा भुर्दंड वाचला. ◀◀ पान २ वर

### पीक विमा संदर्भात श्वेत पत्रिका काढा

धाराशिव जिल्ह्यात सुद्धा मोठा पीक विमा घोटाळा झाला आहे. कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी सुद्धा पीक विमा घोटाळा झाल्याची कबुली दिली आहे. त्यामुळे पिकविम्याच्या संदर्भात श्वेतपत्रिका निघाली पाहिजे, अशी मागणी उद्धव ठाकरे गटाचे आमदार कैलास पाटील यांनी केली आहे. सीएससीवर कारवाई करून काही होणार नाही. या योजनेतील घोटाळ्यामागे राजकारणी व्यक्ती असेल तर त्या सर्वांवर कारवाई झाली पाहिजे अशी मागणी त्यांनी केली.

### मागच्या कृषीमंत्र्यांचा कारभार तपासा

मागच्या कृषिमंत्र्यांनी काय केले आहे याची माहिती घ्यावी लागेल, असा चिमटा पण कैलास पाटील यांनी मंत्री धनंजय मुंडे यांना काढला. बीड जिल्ह्यातून धाराशिव जिल्ह्यातील पिकविमा भरला आहे. त्यामुळे बीड जिल्ह्यात काय सुरू आहे, यासंदर्भात तुम्हाला सगळं माहीत आहे. ज्या जमिनी गायरान आहेत किंवा शासकीय भूखंडांवर सुद्धा पिक विमा भरण्यात आला आहे. शासकीय भूखंडाची सरकारकडे माहिती नसते का? असा रोकडा सवाल त्यांनी केला. तर पीक विमा संदर्भात श्वेतपत्रिका काढण्याची आग्रही मागणी केली.

## महादेव मुंडे हत्येनंतर पुन्हा नवा गौप्यस्फोट

### परळीतील एका मुलीच्या खूनाबाबत आ.सुरेश धसांचे मोठे वक्तव्य

सोलापुर । प्रतिनिधी

महादेव मुंडे हत्येबाबत खुलासा केल्यानंतर आता आ. सुरेश धस यांनी परळीतील एका कला शिक्षकाच्या मुलीच्या खूनाचा खूलासा केला आहे. यात आकाच्या मुलाचा हात असल्याचा संशय सुध्दा त्यांनी व्यक्त केला आहे.



सरपंच हत्या प्रकरणानंतर भाजपा आमदार सुरेश धसांनी परळीतील दोन खुनांचा खुलासा केला आहे. २२ ऑक्टोबर २०२३ ला महादेव मुंडे यांची परळीच्या तहसील कार्यालयासमोर हत्या करण्यात आली होती. हत्येतील आरोपींना अजूनही अटक करण्यात आलेली नाही. सुरेश धसांनी हा दावा केला. हत्येतील आरोपी वाल्मिक कराडच्या मुलाच्या आवतीभवती फिरतात असा आरोपही सुरेश धस करत आहेत. 'कोणाचा अद्याप एकही आरोपी अटक केलेला नाही. आरोपी सुशील म्हणून जो आकाचा पोरागा आहे त्याच्या आवतीभवती फिरताना दिसत आहे, ◀◀ पान २ वर

# आम्हाला न्याय देऊनच भेटायला या

## देशमुख कुटुंबीयांची पंकजा मुंडेंकडे मागणी; धनंजय मुंडेंचा कॉल नाही



सोलापूर । प्रतिनिधी

पंकजा मुंडे यांचा एकदा व्हिडीओ कॉल आलेला, पण आम्हाला न्याय देऊनच भेटायला या असे त्यांना सांगितल्याची माहिती सरपंच संतोष देशमुखांचे बंधू धनंजय देशमुखांनी दिली आहे. संतोष देशमुख हे भाजपचे बूथ प्रमुख होते, त्यामुळे त्यांना न्याय मिळावा अशी मागणीही पंकजा मुंडे यांच्याकडे केली असल्याचे ते म्हणाले. आतापर्यंत धनंजय मुंडे यांचा एकही कॉल आला नाही किंवा त्यांनी आम्हाला न्याय मिळवून देण्यासाठी कोणताही प्रयत्न केला नाही असेही धनंजय देशमुख यांनी सांगितले आहे.

संतोष देशमुख खून प्रकरणानंतर आ. सुरेश धस यांनी मंत्री पंकजा मुंडे यांच्यावर देशमुख कुटुंबाची भेट घ्यायला हवी होती असे सांगत टिका केली होती. त्यावर बऱ्याच दिवसाने खुलासा करीत पंकजा मुंडे यांनी महत्वाचे विधान केले. देशमुख कुटुंबाने सांगितल्यामुळेच मी त्यांना भेटायला गेले नाही, असे सांगितले होते. त्यावर आता देशमुख कुटुंबाची प्रतिक्रिया आली आहे. संतोष देशमुखांची हत्या झाल्यानंतर त्यासंबंधित पंकजा मुंडेंनी एकदा व्हिडीओ कॉल केल्याची माहिती धनंजय देशमुखांनी दिली. त्यावेळी आम्हाला न्याय देऊनच भेटायला या असे संतोष देशमुखांच्या पत्नीने पंकजा मुंडे यांना सांगितले. या काळात मात्र धनंजय मुंडे यांचा एकही ◀◀ पान २ वर



### सर्व आरोपींना शिक्षा होणारच–शिंदे

संतोष देशमुख खून प्रकरणातील सर्व आरोपींना शिक्षा होणार असून कोणीही यातून सुटणार नाही, अशी प्रतिक्रिया उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी दिली.

### विष्णू चाटेवर आणखी एक गुन्हा दाखल

संतोष देशमुख प्रकरणातील आरोपी विष्णू चाटे याच्यावर आणखी एक गुन्हा दाखल करण्यात आला आहे. विष्णू चाटेने प्रकरणानंतर आपला स्वत:चा मोबाईत नाशिकला फेकून दिल्याची कबुली दिली होती. कबुलीनंतर अखेर एसआयटीने विष्णू चाटेवर पुरावा नष्ट करण्याचा गुन्हा दाखल केला आहे.

### अंजली दमानियांचे बीड पोलिसांवर गंभीर आरोप

सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी पोलिसांवर गंभीर आरोप केले आहेत. ३ जुलै २०२४ ला वाल्मिक कराडविरोधात एफआयआर दाखल झाली होती मात्रा चार्चशीटमधून त्याचे नाव वगळण्यात आल्याचा दावा दमानियांनी केला आहे. या प्रकरणाचा पुन्हा तपास करण्याची मागणी त्यांनी केली आहे. यासंदर्भात दमानियांनी ट्विट केले आहे.

### कृष्णा आंधळे फरार घोषित

संतोष देशमुख हत्या प्रकरणातील आरोपी कृष्णा आंधळे याला फरार म्हणून घोषित करण्यात आले आहे. गेल्या महिनाभरापासून बीड हत्या प्रकरणातील आरोपी कृष्णा आंधळे हा सापडत नसल्याने अखेर त्याला फरार घोषित करण्यात आले आहे.

### वाल्मिक कराडला मंत्रीपदाचे संरक्षण–आ. क्षीरसागर

मी सुरुवातीपासून वाल्मिक कराड हाच मुख्य सुत्रधार असल्याचे सांगत असून त्यास एका मंत्र्याचे सहकार्य असल्याचे आ. संदिप क्षीरसागर यांनी सांगितले आहे.

## वाल्मिक कराडला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी

### खंडणी प्रकरणाचा प्राथमिक तपास पुर्ण; मकोकामुळे जामीन मिळण्याची आशा धुसर?

बीड–वाल्मिक कराडला १४ दिवसांची न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणात कराडवर मकोकाअंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. व्हीसीद्वारे वाल्मिक कराडची सुनावणी पूर्ण झाली. चौकशी पूर्ण झाल्याने सीआयडीने कोठडीमध्ये वाढ मागितली नाही. खंडणी गुन्ह्यात कराडला न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली आहे. मात्र मकोका लावण्यात आल्याने कराडला जामीन मिळण्याची शक्यता तशी कमीच असल्याचे म्हटले जात आहे.

खंडणी प्रकरणी अटकेत असलेल्या वाल्मिक कराडला दिलासा मिळाला असून १४ दिवसाची न्यायालयीन कोठडी मिळाली आहे. संतोष देशमुख हत्या प्रकरणात वाल्मिक कराडवर मकोका अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला होता. एसआयटी कोठडी संपल्याने कराडला बुधवारी न्यायालयासमोर हजर करण्यात आले. यावेळी सुनावणी होऊन न्यायालयाने त्यास १४ दिवसाची न्यायालयीन कोठडी सुनावली आहे. खंडणी प्रकरणात न्यायालयीन कोठडी मिळाली असली तरी दुसरीकडे कराडला मकोका लावण्यात आल्याने दोषारोपपत्र दाखल करण्यासाठी ६ महिन्याचा कालावधी असल्याने जामीन मिळणे सुध्दा अवघड होणार आहे.

### दमानियांनी घेतली रश्मी शुक्लांची भेट

सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानियांनी बुधवारी पोलीस महासंचालक रश्मी शुक्ला यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान त्यांनी बीडची सत्य परिस्थिती काय आहे, याची माहिती त्यांनी शुक्लांना दिली. तसेच धनंजय मुंडेंच्या अनेक कंपन्याबाबत त्यांनी माहिती दिली. या कंपन्यांमध्ये वाल्मिक कराड शेअर होल्डर असल्याचेही त्यांनी सांगितली. माहिती देत धनंजय मुंडेंवर कारवाई करण्याची मागणी केली आहे.

### न्यायालयीन कोठडी ही पळवाट–दमानिया

वाल्मिक कराडच्या न्यायालयीन कोठडीबाबत सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानियांनी शंका उपस्थित केली आहे. मंगळवारी समोर आलेल्या सीसीटीव्हीच्या फुटेजनंतर सखोल चौकशी व्हायला हवी होती, मात्र वाल्मिकला न्यायालयीन कोठडी दिली ही पळवाट असल्याचा आरोप दमानियांनी केला आहे. इतकेच नाही तर बीड प्रकरणाची चौकशी आणि सुनावणी मुंबईत घ्या, सर्व आरोपींना आर्थर रोड कारागृहात ठेवा अशी मागणी त्यांनी केली आहे.

## विरोधी पक्षनेतेपदाबाबत लवकरच निर्णय–पटोले

मुंबई । प्रतिनिधी



विरोधी पक्षनेतेपदाबाबत दोन तीन दिवसांत निर्णय घेणार असल्याची माहिती नाना पटोले यांनी दिली आहे. शरद पवार, उद्धव ठाकरे आणि महाविकास आघाडीतील महत्त्वाचे नेते बसून हा निर्णय घेतला जाणार असल्याचेही त्यांनी सांगितले आहे. तर विधिमंडळ समित्यांबाबत दोन तीन दिवसांत विधानसभा अध्यक्षांची सुद्धा भेट घेणार असल्याचे नाना पटोलेंनी म्हटले आहे.

## चंपावती महोत्सव ना.एकनाथ शिंदे महाकरंडक स्पर्धेत सर्व शाळांनी जास्तीतजास्त संख्येने सहभागी व्हावे-जगताप, मुळूक, गलधर

### उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, खा.डॉ. श्रीकांत शिंदे यांना महोत्सवाचे निमंत्रण!

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री नामदार एकनाथजी शिंदे साहेब आणि संसदरत्न खासदार डॉ श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त बीडमध्ये गतवर्षीप्रमाणे याही वर्षी दि. १ फेब्रुवारी ते ८ फेब्रुवारी २०२४ यादरम्यान बीड शहरातील यशवंतराव चव्हाण नाट्यगृह येथे आठ दिवसीय जिल्हास्तरीय चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धेचे भव्य-दिव्य आयोजन करण्यात आले आहे. गतवर्षीच्या अफाट यशानंतर जिल्ह्याच्या सांस्कृतिक क्षेत्रात मानबिंदू ठरलेल्या चंपावती महोत्सव ◀◀ पान २ वर



## आ.संदीप क्षीरसागरांनी घेतली उपमुख्यमंत्री अजित पवारांची भेट

### बीड एमआयडीसी पंचतारांकित करण्याची केली आग्रही मागणी

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री ना.अजित दादा पवार यांची आ.संदीप क्षीरसागर यांनी बुधवारी (दि.२२) रोजी मुंबई येथे भेट घेतली. यावेळी आ.क्षीरसागर यांनी बीडच्या पालकमंत्री पदी निवड झाल्याबद्दल ना.अजितदादांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. तसेच बीड येथील एमआयडीसीच्या विकासाबाबत विविध आग्रही मागण्या आ.संदीप क्षीरसागर यांनी ना.अजिदादा ◀◀ पान २ वर



## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२२ जानेवारी २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ५.०० क्विंटल | २,५९० | ३,२८५ | २,९३७ |
| ज्वारी/हायब्रिड: ४७.०० क्विंटल | १,९९० | २,८६० | २,४३६ |
| मका/लोकल: ०.५० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : २२९.०० क्विंटल | ५,००० | ७,३०० | ६,९९० |
| उडीद : १.५० क्विंटल | ६,३०० | ६,३०० | ६,३०० |
| बाजरी: १४.५० क्विंटल | २,४०० | ३,५३१ | २,९७५ |
| मुग : ५.५० क्विंटल | ७,३०१ | ७,४५० | ७,३७५ |
| सोयाबीन: ३०.५० क्विंटल | ४,०९० | ४,१०० | ४,०९५ |
| हरभरा: १३.०० क्विंटल | ५,७०१ | ६,८०० | ६,१०० |

# सामाजिक ऐक्य व जातीय सलोखा अबाधित राहावा

## धनंजय मुंडेंची गहिनीनाथ गडावर प्रार्थना; आरोपींना फाशी द्या, खटला फास्टट्रॅक कोर्टात चालवा

बीड । प्रतिनिधी

आपल्या बीड जिल्ह्यातील सामाजिक ऐक्य व जातीय सलोखा कायम अबाधित राहावा अशी प्रार्थना मंत्री धनंजय मुंडे यांनी श्री गहिनीनाथ महाराज व संत वामन भाऊ यांच्या चरणी केली आहे. तसेच संतोष देशमुख खून प्रकरणाचा खटला फास्टट्रॅक कोर्टात चालवण्याबरोबर या प्रकरणातील सर्व आरोपींना फाशीची शिक्षा देण्याची मागणी देखील त्यांनी यावेळी केली. श्रीक्षेत्र गहिनीनाथ गड येथे संत वामन भाऊ यांचा ४९ वा पुण्यतिथी सोहळा साजरा करण्यात आला. यावेळी ते बोलत होते.



राज्यातील विधानसभा निवडणुकांपूर्वीपासून बीड जिल्ह्यातील जातीय सलोखा व सामाजिक स्वास्थ बिघडल्याचे पाहायला मिळत आहे. त्यातच, गेल्या महिनाभरापासून बीडमधील सरपंच संतोष देशमुख हत्याकांडामुळेही बीड जिल्हा चर्चेत असून जिल्ह्यातील दहशत व गुन्हेगारीची अनेक प्रकरणे समोर आली आहेत. ◀◀ पान २ वर

### दोघांनीही एकमेकांना बांधला फेटा

दरम्यान संत वामन भाऊ यांच्या समाधीची महापूजा संपन्न झाल्यानंतर श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडाचे महंत विठ्ठल महाराज शास्त्री यांनी वारकरी संप्रदायाची ओळख असलेला मानाचा फेटा धनंजय मुंडे यांना बांधला. तर गडाचे महंत म्हणून धनंजय मुंडे यांनी विठ्ठल महाराज शास्त्री यांनाही तसाच फेटा स्वतःच्या हाताने बांधला. यावेळी संत वामन भाऊ यांच्या नावाचा जयघोष असंख्य भाविकांच्या उपस्थितीत करण्यात आला.

cmyk

## अग्रलेख

# महाकुंभात अग्नितांडव!

प्रयागराज येथे १३ जानेवारी ते २६ फेब्रुवारी दरम्यानच्या महाकुंभ मेळ्याला शाही प्रारंभ झाला आहे. या महाकुंभ मेळ्याची तयारी उत्तर प्रदेश प्रशासनाने उत्तम प्रकारे केली आहे. महाकुंभाला येणा-या भाविकांची कोणतीही गैरसोय होऊ नये म्हणून विशेष उपाययोजना करण्यात आल्या आहेत. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी जातीने महाकुंभाच्या तयारीचा आढावा घेतला होता. या पवित्र धार्मिक सोहळ्यामुळे उत्तर प्रदेशच्या तिजोरीत सुमारे २ लाख कोटी रुपये जमा होणार आहेत. या महाकुंभाला ४० ते ४५ कोटी भाविक येण्याची शक्यता आहे. महाकुंभ ही भारताची अध्यात्मिक आणि सांस्कृतिक परंपरा आहे. यामुळे देश-विदेशातील जनतेला आपल्या प्राचीन परंपरा समजण्यास मदत होणार आहे. येणा-या पिढ्यांनाही हा महाकुंभ मार्गदर्शक ठरेल. यंदाचा महाकुंभ भव्यदिव्य आणि डिजिटल असेल.

भाविकांच्या सुविधांसाठी पर्यटन नकाशा, कृत्रिम बुद्धिमत्तेच्या सहायाने सुरक्षा यंत्रणा व स्मार्ट फोनच्या सहायाने प्रसाधनगृहांची स्वच्छता पाहण्याची सोय करण्यात आली आहे. कोट्यवधी भाविक उत्तर प्रदेशात दाखल होत असल्याने प्रवास, निवास व भोजन आदींमुळे स्थानिक व्यवसाय व रोजगार वाढणार आहे. २०२४ मध्ये १६ कोटी भाविकांनी काशी विश्वनाथाचे दर्शन घेतले तर अयोध्येत जानेवारी ते सप्टेंबर २०२४ मध्ये १३ कोटी ५५ लाख भाविक आले होते. यंदाच्या महाकुंभात ४ प्रकारच्या तंबूंची व्यवस्था करण्यात आली आहे. डिलक्स, प्रीमियम, डिलक्स ऑन रॉयल बाथ आणि प्रीमियम ऑन वॉयल बाथ अशा चार प्रकारच्या तंबूंची व्यवस्था आहे. डिलक्स रूममध्ये एक दिवसाचे भाडे साडे दहा हजार रुपये आहे. प्रीमियम श्रेणीचे दिवसाचे भाडे १५,५२५ रुपये आहे. शाही स्नानाच्या दिवशी डिलक्स तंबूचे भाडे १६ हजार १०० रुपये तर प्रीमियम श्रेणीतील तंबूचे भाडे दिवसाला २१ हजार ७३५ रुपये ठेवण्यात आले आहे. या महाकुंभात उद्योगपती गौतम अदानी दररोज १ लाख भाविकांना प्रसादाचे वाटप करत आहेत. महाकुंभामध्ये राहण्याची शाही व्यवस्था करण्यात आली आहे. नदीच्या किनारी ४४ तंबू आहेत. त्यात २ जणांची राहण्याची सोय आहे. या तंबूचे एका दिवसाचे भाडे १ लाख रुपये आहे. या तंबूत बटलरपासून रुम हिटर, बाथरूम, गिझर आदी सुविधा आहेत. १४, २९ जानेवारी व ३ फेब्रुवारीला या तंबूंना मोठी मागणी आहे. कारण या दिवशी शाही स्नान असते पैकी १४ जानेवारीचे शाही स्नान पार पडले आहे. प्रयागराज येथे गंगा, यमुना आणि सरस्वती नदीचा पवित्र संगम आहे. ४५ दिवस चालणा-या या कुंभमेळ्यात कडेकोट सुरक्षा व्यवस्था आहे. १३ जानेवारीला महाकुंभमेळा सुरू झाला. पहिल्याच दिवशी दीड कोटीहून अधिक भाविकांनी त्रिवेणी संगमावर स्नान केले. दर तासाला सुमारे २ लाख भाविकांचे स्नान झाले. महाकुंभाच्या मुख्य स्नान आणि मकरसंक्रांतीच्या दिवशी हेलिकॉप्टरमधून संत आणि भक्तांवर २० क्विंटल फुलांचा वर्षाव करण्यात आला.

दर १२ वर्षांना होणारा कुंभमेळा २६ फेब्रुवारी रोजी महाशिवरात्रीला संपेल. अशा या शाही महाकुंभमेळ्याला रविवारी (१९ जानेवारी) भीषण आग लागल्याने गालबोट लागले. या आगीत १८ तंबू जळून खाक झाल्याचे वृत्त आहे. सुदैवाने या दुर्घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी घटनास्थळी जाऊन परिस्थितीचा आढावा घेतला. कुंभनगरीतील सेक्टर १९ मधील एका तंबूत स्वयंपाक सुरू असताना दुपारी साडेचारच्या सुमारास एका सिलिंडरमध्ये स्फोट झाला. या ठिकाणी गीता प्रेस या प्रकाशन संस्थेचे शिबिर आहे. आगीने आजूबाजूचे तंबू पेटले त्यामुळे तंबूतील सिलिंडरचेही स्फोट झाले. आग लागलेल्या ठिकाणाजवळ रेल्वे पूल आहे. अग्निशमन दल, एनडीआरएफ आणि एसडीआरएफच्या कर्मचा-यांनी तासाभरात आग आटोक्यात आणली. आगीत गीता प्रेसचे लाखो रुपयांचे साहित्य जळाले. आगीवर पूर्णपणे नियंत्रण मिळवण्यात आले आहे. रविवारपर्यंत सुमारे ८ कोटींहून अधिक भाविकांनी संगमावर स्नान केले, असो. एवढ्या मोठ्या सोहळ्याचे आयोजन करताना काही अप्रिय घटना होतातच. पर्यावरणाच्या असमतोलातून नैसर्गिक आपत्ती उद्भवल्यास त्यावर नियंत्रण ठेवणे हे प्रगतीचा टेंभा मिरवणा-या मानवाला शक्य होत नाही, हे आजवर अनेक वेळा सिद्ध झाले आहे. गत आठवड्यापासून लॉस एंजेलिसमध्ये भडकलेल्या आगीवर नियंत्रण मिळवण्याचे प्रयत्न सुरू असताना दक्षिण कॅलिफोर्नियात नवी आग लागली. महाशक्तीशाली अमेरिकासुद्धा या आगीसमोर हतबल झाली. पृथ्वी, जल, अग्नी, वायू आणि आकाश या निसर्गातील मुलभूत घटक असलेल्या पंचमहाभूतांचे निसर्गाप्रमाणेच मानवी जीवनातही मोठे महत्त्व आहे. निसर्गाचा समतोल ढासळल्यास ही पंचतत्त्वे बेकाबू होतात. म्हणूनच निसर्गाच्या विरोधात जाणे मानवाला अतिशय महागात पडते. निसर्गाचे रौद्र स्वरूप निसर्गाची हानी करून उतलेल्या-मातलेल्या मानवाला त्याची मर्यादा दाखवण्याचे काम करते. यामुळे मानवाने त्यातून धडा घेत निसर्गाची हानी होणार नाही याची काळजी घ्यायला हवी. लॉस एंजेलिसच्या अग्नितांडवाने तेच दाखवून दिले आहे. लॉस एंजेलिस येथील जंगलाला लागलेली आग हॉलिवूडपर्यंत पोहोचली. ३ दिवसांत सुमारे ४ हजार ८०० हेक्टर क्षेत्राला या आगीची झळ बसली त्यात १९०० इमारती खाक झाल्या. २८ हजार घरांचे नुकसान झाले आणि ५ जणांचा मृत्यू झाला. गेल्या काही दशकामध्ये जलवायू प्रदूषण, वाढते शहरीकरण आणि मानवी हस्तक्षेप वाढल्याने अशा घटना वाढल्या आहेत. दुस-या एका वृत्तानुसार प्रयागराजमधील महाकुंभ मेळ्यात आग लागल्याने सुमारे २०० तंबू जळून खाक झाल्याचे सांगण्यात येते. इतक्या प्रचंड प्रमाणात आयोजित धार्मिक मेळ्यात काही अपघात घडणार हे अपेक्षित असले तरी शक्य तेवढी खबरदारी ही घ्यायलाच हवी. या पुढे अप्रिय घटना न घडता १४४ वर्षानंतर आलेला पावन महाकुंभ मेळा पार पडावा, हीच सदिच्छा!

# महाराष्ट्रात २० जिल्ह्यात दहशतवादी संघटनांचे जाळे

## मोठा धोका: केंद्रीय गुप्तचर खात्याचा इशारा, पोलिस यंत्रणा अलर्ट

**मुंबई । प्रतिनिधी**

**बांगलादेशी आणि रोहिंग्या रडारवर असून, केंद्रीय गुप्तचर खात्याकडून सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. मुंबईसह महाराष्ट्रात बांगलादेशच्या जमात ए इस्लामी, या दहशतवादी संघटनेचे स्लीपर सेल कार्यरत असल्याची माहिती समोर आली आहे. या स्लीपर सेलचे नेटवर्क राज्यातील तब्बल २० जिल्ह्यांमध्ये असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळे केंद्रीय गुप्तचर खात्यासह, राज्यातील गुप्तचर यंत्रणा आणि पोलीस प्रशासन सतर्क झाले आहे. तपास यंत्रणा सक्रिय झाली असून, युद्धपातळीवर रोहिंग्या आणि बांगलादेशींचा शोध सुरू आहे.**

महाराष्ट्रातील जवळपास वीस जिल्ह्यांमध्ये बनावट जन्म प्रमाणापत्र आणि दाखले वितरीत झाले असल्याचा अंदाज व्यक्त होत आहे. राज्यात जवळपास दीड ते दोन लाख बांगलादेशी घुसखोर असू शकतात,असा तपास यंत्रणेचा अंदाज आहे. या घुसखोरांना मदत करणारे स्थानिक आणि प्रशासनातील अधिकारी देखील आता सरकारच्या रडारवर असणार आहेत. बांगलादेशातील सत्ता बदलानंतर पुन्हा एकदा जमात ए इस्लामी संघटना कार्यरत झाली असून, या दहशतवादी संघटनेचा भारताला मोठा धोका असल्याचं गुप्तचर विभागाने म्हटले आहे. दरम्यान बांगलादेश आणि म्यानमारमधून अवैध रीतीने मोठ्या प्रमाणात महाराष्ट्रात येणाऱ्या घुसखोरांविरोधात त्वरित योग्य ती कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश केंद्रीय गृह मंत्रालयाकडून महाराष्ट्र राज्याचे मुख्य सचिव, पोलीस महासंचालक आणि अन्य संबंधित यंत्रणांना देण्यात आले आहेत. माजी खासदार राहुल शेवाळे यांनी बांगलादेशी घुसखोरांविरोधात कठोर कारवाई करण्याबाबत केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्याकडे केलेल्या मागणीची दखल घेत, केंद्रीय गृहमंत्रालयाने वरील निर्देश दिले आहेत. अभिनेता सैफ अली खानवर बांगलादेशी घुसखोरांकडून झालेल्या हल्ल्याची घटना ताजी असतानाच केंद्रीय गृह मंत्रालयाच्या या आदेशाने घुसखोरांच्या विरोधातील कारवाईला वेग येण्याची शक्यता आहे.

# लाडक्या बहिणीबाबत सरकारचा मोठा निर्णय

## मंत्री अदिती तटकरेंनी सांगितले पैसे परत घेणार की नाही?



### नेमकं काय म्हणाल्या आदिती तटकरे?

आदिती तटकरे यांनी मोठी घोषणा केली आहे, अपात्र महिलांचे पैसे परत घेतले जाणार नसल्याचं त्यांनी म्हटलं आहे. अनेक अपात्र महिलांनी या योजनेचा लाभ घेतला, मात्र शासनाने कुठलाही लाभ परत घेतलेला नाहीये. योजनेचे मुल्यमापन करणे यात नवीन काही नाही, असे आदिती तटकरे यांनी म्हटले आहे. आदिती तटकरे यांच्या या घोषणेमुळे लाडक्या बहिणींना मोठा दिलासा मिळाला आहे.

**मुंबई । प्रतिनिधी**

**विधानसभा निवडणुकीनंतर लाडक्या बहिण योजनेबाबत बरेच तर्कवितर्क लावले गेले. योजना बंद होणार, पैसे परत घेतले जाणार, यासह विविध चर्चा होत्या. अखेर लाडक्या बहिणीबाबत राज्य सरकारने मोठी घोषणा केली असून मंत्री अदिती तटकरे यांनी याबाबत खुलासा केला आहे.**

गेल्या विधानसभा निवडणुकीत मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना ही गेम चेंजर ठरली. निवडणुकीच्या तोंडावर महायुती सरकारकडून या योजनेची घोषणा करण्यात आली होती आणि ती अल्पावधीतच लोकप्रिय ठरली. अशातच महायुती सरकार पुन्हा राज्यात आल्यास लाभार्थी महिलांना १५०० रूपयांऐवजी २१०० रूपये देण्यात येणार असल्याचे आश्वासन महायुती सरकारकडून देण्यात आले. त्यामुळे २१०० रूपये कधी मिळणार याकडे महिलांचे लक्ष लागून आहे. तर दुसरीकडे या योजनेचा सरकसकट नियम आणि निकषांचा विचार न करता निकष धुडकावून अपात्र ठरणाऱ्या महिलांनी देखील या योजनेचा लाभ घेतल्याचे समोर आले होते. यानंतर अपात्र ठरणाऱ्या महिलांच्या खात्यातून दंडासह योजनेची रक्कम परत घेतली जाणार? अर्जांची छानणी, पडताळणी सुरू असताना जर महिला अपात्र ठरली तर पैसे परत घेतले जाणार का? असे सवाल असताना दरम्यान या योजनेबाबत आता मोठी बातमी समोर आली आहे. आदिती तटकरे यांनी मोठी घोषणा केली आहे. अनेक अपात्र महिलांनी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेतला असल्याची माहिती मंत्री आदिती तटकरे यांनी दिली. मात्र अपात्र महिलांचे पैसे परत घेतले जाणार नसल्याची मोठी माहिती देखील आदिती तटकरे यांनी दिली.

# श्री क्षेत्र गहिनीनाथ गडासाठी निधी कमी पडू दिला जाणार नाही-मुख्यमंत्री फडणवीस

## निश्चितच गडावर दर्शनासाठी येणार-पंकजाताई मुंडे

**मानूर । प्रतिनिधी**

**श्री क्षेत्र गहिनीनाथ गडावर विविध विकास कामे चालू असुन या पुर्वी दोन वेळा आपण आलो होतो तेव्हा २५ कोटीची विकास कामे मंजूर करून आज गडावर वीवीध विकास कामे होत आहेत तेव्हा येत्या काळात गडाच्या विकासासाठी पैसा कमी पडू दिला जाणार नसल्याचे प्रतीपादन मोबाईल ऑडिओ क्लिप द्वारे महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री नामदार देवेंद्रजी फडवणीस यांनी केले.**

तर मला यायला उशीर होणार होता माझे हेलिकॉप्टरचा पायलट नसल्याने मी येऊ शकले नाही तेव्हा सर्वांची दिलगिरी व्यक्त करते पण मी निश्चित गडावर येऊन दर्शन करणार असल्याचे व मी उतणार नाही मातणार नाही तुम्हाला माझं नाव घेतल्यावर मान खाली घालायची वेळ येऊ देणार नाही असे मी कदापिही वागणार नसल्याचे महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण मंत्री मा ना पंकजाताई मुंडे यांनी श्री क्षेत्र गहिनीनाथ गडावरील श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या ४९ व्या पुण्यतिथी निमित्त सोहळयात उपस्थित राहता आले नसल्याने मोबाईल व्हाईस क्लिप द्वारेसर्व समाज बांधवांना बोलताना व्यक्त केले. श्रीक्षेत्र वामनभाऊ महाराज यांची बुधवार दिनांक २२ रोजी श्री क्षेत्र गहिनीनाथ गडावर ४९ वी पुण्यतिथी सोहळा मोठ्या थाटात संपन्न झाला. व्यासपीठावर संस्थांचे मठाधिपती श्री विठ्ठल महाराज बीड जिल्ह्याचे माजी पालकमंत्री जयदत्त क्षीरसागर, मा आ भीमराव धोंडे, मा आ बाळासाहेब मुरकुटे, पै सतीश आबा शिंदे आधी विविध पक्षाचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते त्या प्रसंगी महंत विठ्ठल महाराज यांनी येणाऱ्या वर्षांमध्ये श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या पन्नासाव्या पुण्यतिथी निमित्त सात दिवस स्वताचे आयोजन करण्यात आले असून शिस्त भाऊंना प्रिय होते तेव्हाही पुण्यतिथी मध्ये जत्रा नव्हे ती यात्रा आहे वारकरी संप्रदायाचे हे मूळ अधिष्ठान असो तर क्षेत्र गहिनीनाथ गडावर ही परंपरा ज्ञानोबारायापासून आज पर्यंत चालत आलेली आहे गेल्या सात महिन्यापूर्वी माझा गंभीर अपघात झाला होता परंतु सद्गुरु भाऊंच्या आशीर्वादाने मला पुन्हा ५० वी पुण्यतिथीनिमित्त माझ्या हातून व्हावी म्हणून सद्गुरु भाऊंच्या आशीर्वादाने या कार्यक्रमास उपस्थित राहता आले असल्याचे मत संस्थांचे मठाधिपती गुरुवर्य ह भ प विठ्ठल महाराज यांनी व्यक्त केले. येथे मुख्यमंत्री देवेंद्र फडवणीस नाहीत आले ते दावोस मध्ये दररोज हजारो कोटींचे उद्योग महाराष्ट्रात आणण्यासाठी गेले आहेत तेव्हा त्यांनी एखादा उद्योग बीड जिल्ह्याला द्यावा असे माजी आमदार भीमराव धोंडे यांनी म्हटले आहे दरवर्षी मी इथे न चुकता गहीनाथ गडावर येतो सद्गुरु वामन भाऊ यांचा आशीर्वाद घेऊन व विठ्ठल महाराजांच्या आशीर्वाद घेऊन यापुढेही मी सातत्याने सद्गुरु बाबांचे आशीर्वाद घेणार आहे असल्याचे प्रतिपादन माजी आमदार बाळासाहेब मुरकुटे यांनी म्हटले वैराग्यमूर्ती संत वामनभाऊ महाराज यांची ४९ वी पुण्यतिथी असून मी भाऊंच्या स्मृतीला आदरांजली वाहतो सातत्याने वाढत्या



जनतेचा लोंढे पाहता क्षेत्र गहिनीनाथ गडावर मुख्यमंत्र्याच्या विकास निधीतून अनेक कामे चालू आहेत आम्ही देखील आमच्या काळामध्ये अनेक कामे केली महाराजांनी जो आदेश देतील तो पूर्ण करू असे मत माजी पालकमंत्री जयदत्त अण्णा क्षीरसागर यांनी म्हटले. श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडावर सध्या २५ कोटीची कामे चालू असून या ठिकाणी येण्यासाठी आमंत्रणाची गरज नाही सिध्द पुरुष म्हणून संत वामनभाऊ महाराज यांचा वसा या ठिकाणी आजही आहे शिक्षण समता बंधुता यांची शिकवण देणारे संत वामनभाऊ महाराज होऊन गेले हा गड सर्व जाती धर्माचा गड आहे आता २५ कोटीची विकास कामे चालू आहेत आणि यापुढे कुठलाही कामासाठी सरकारतर्फे पैसे कमी पडू दिला जाणार नाही श्री क्षेत्र गहिनीनाथ गड ते श्रीक्षेत्र पंढरपूर हा पालखी मार्ग लवकरच पूर्ण करणार सध्या गडावर ३०० ते ४०० चा भव्य दिव्य मंडप लवकरच पूर्ण होत असल्याने सध्या उभारणीचे काम चालू आहे भक्तनिवास प्रवेशद्वार इत्यादी कामे दर्जेदार होणार असल्याचे यावेळी बोलताना म्हटले आहे सकाळी सहा ते नऊ महाराष्ट्र राज्याचे मंत्री धनंजय मुंडे यांच्या व महंत विठ्ठल महाराज यांच्या हस्ते नवनाथाचा परंपरे नुसार व श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या समाधीचा महा अभिषेक होऊन सकाळी दहा वाजता ह भ प आसाराम महाराज बडे श्रीक्षेत्र आळंदी देवाची यांचे सुश्राव्य कीर्तन झाले आणि बरोबर अकरा वाजून ४५ मिनिटांनी पुण्यतिथीचे औचित्य साधून पुष्पवृष्टी करण्यात आली याप्रसंगी घा पारगाव येथील डॉ तुकाराम नेहरकर यांनी हेलिकॉप्टर द्वारे समाधीवर पुष्पवृष्टी करून आपली सेवा प्रगट केली .दिनांक २२ जानेवारी १९७६ दुपारी बरोबर ११ ४५ वाजता सद्गुरु वामनभाऊ यांनी आपला देह ठेवला होता आज बरोबर ४९ वर्षा नंतरही याच टायमावर श्री संत वामनभाऊ यांच्या समाधीवर पुष्पवृष्टी होऊन हा पुण्यतिथी सोहळा साजरा होत असतो या यावेळी बरोबर एक वाजता आलेल्या सर्व भाविक भक्तांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले हजारोंची संख्येने महिला मंडळांची देखील मोठी उपस्थिती होती सर्व कार्यक्रम व्यवस्थित होऊन या प्रसंगी महाराष्ट्रातील तमाम भावीक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित राहून हा कार्यक्रम यशस्वी केला.

## पान १ वरून...

### पिक विम्यातील

बोगस पिक विमा उतरवणाऱ्यांमध्ये कांदा उत्पादक शेतकऱ्यांचा आकडा सर्वाधिक असल्याचं कृषी विभागाच्या निदर्शनास आले आहे. कमी क्षेत्रावर लागवड झालेली नसल्याचा शेतकऱ्यांनी न कळवल्याने ही बाब समोर आली. बोगस पिक विमा चा प्रकार उघडकीस आल्यानंतर येणाऱ्या काळात कृषी विभाग पिक विमा कंपन्यांच्या माध्यमातून सेंटरला भेटी देणार आहे. कृषी विभाग त्यांच्या पिक विमा उतरवल्याची पडताळणी करणार आहे.

-------------

### आम्हाला न्याय देऊनच

कॉल आला नाही असेही धनंजय देशमुखांनी सांगितले. बीडचे पालकमंत्री अजित पवारांना मस्साजोगचे ग्रामस्थ जाब विचारणार असल्याचे धनंजय देशमुख म्हणाले. अजितदादांना मस्साजोगमध्ये बोलवायचे की बीडमध्ये त्यांची भेट घ्यायची हे ग्रामस्थ ठरवतील असेही ते म्हणाले. या प्रकरणात सरकारी वकिलाची नियुक्ती होण्यासाठी वेळ लागत असल्याचे धनंजय देशमुख म्हणाले. या प्रकरणात ज्येष्ठ कायदेतज्ज्ञ उज्ज्वल निकम यांची नियुक्ती लवकरात लवकर करण्यात यावी अशी मागणीही त्यांनी केली.

-----------

### महादेव मुंडे हत्येनंतर

असे सुरेश धस म्हणाले. परळीत एका कला शिक्षकाच्या मुलीला जाळून मारले सुरेश धसांनी हा देखील एक आरोप केला आहे. मुलीच्या मृत्यूचा धक्का घेतल्या नंतर कला शिक्षकाने आत्महत्या केल्याचे धस सांगतात. तर शिक्षकाची बायको वेडी झाली मुलगा गायब झाला. दुसरी मुलगी लग्न करून गेली परत आलीच नाही अशी ही माहिती सुरेश धस यांनी दिली. महादेव मुंडे खून प्रकरणाचा गौप्यस्फोट केल्यानंतर आता धसांनी एका मुलीच्या हत्येबाबत विधान केल्याने आकाच्या मुलाच्या अडचणी वाढणार असल्याचे बोलले जात आहे.

----------

### आ.संदीप क्षीरसागरांनी घेतली

यांच्याकडे केल्या आहेत. बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री पदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन करण्यासाठी आ.संदीप क्षीरसागर यांनी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री ना.अजित दादा पवार यांची भेट घेतली. बीड शहर हे जिल्ह्याचे ठिकाण आहे. याठिकाणी जिल्हाभरातून बेरोजगार, रोजगारासाठी येत असतात. बीडमध्ये भविष्यातही रोजगारासाठी स्थलांतरण होणारी संख्या निश्चित वाढणार आहे. सद्यस्थितीला बीड येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ उपविभाग अंतर्गत एमआयडीसी मध्यम स्वरूपात चालू आहे. परंतु सध्याच्या आणि भविष्याचा विचार करता येथील एमाआयडीसीचा विकास होणे अत्यंत गरजेचे आहे. दरम्यान यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ उपविभाग बीड आणि बीड महसूल विभागाकडे गायरान जमीन उपलब्ध आहे. अहमदनगर-बीड रेल्वे मार्ग देखील सुरू होत आहे. तसेच बिंदुसरा धरणातून १२ एमएलटी पाणी बीड शहराला ग्रॅव्हिटीद्वारे बीड शहरात येते. यासोबतच बीड शहराला पाणीपुरवठा करण्यासाठी माजलगाव धरणातून बॅकवॉटरद्वारे ४९ एमएलटीची योजना पूर्ण झालेली आहे. त्यामुळे पाणघसाठा देखील मुबलक उपलब्ध आहे. त्यामुळे बीडची एमआयडीसी पंचतारांकित स्वरूपाची होण्याकरिता संबंधित विभागाला आदेशित करून कृती आराखड्यासह प्रस्ताव करण्यासाठी निर्देश द्यावेत अशी आग्रही मागणी आ.संदीप क्षीरसागर यांनी ना.अजित दादा पवार यांच्याकडे केली. यावर ना.अजितदादा पवार यांनीही सकारात्मकता दाखवली असून लवकरच बीडच्या एमआयडीसीचा आशावाद आ.संदीप क्षीरसागर यांनी व्यक्त केला आहे.

-----------

### चंपावती महोत्सव ना.एकनाथ

उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक स्पर्धेत यावर्षी नृत्य, नाट्य, संगीत, चित्रकला, रांगोळी स्पर्धा घेण्यात येणार आहेत. राज्याच्या आणि देशाच्या सांस्कृतिक क्षेत्रात कलाकारांचा बालेकिल्ला म्हणून बीडची ओळख सर्वश्रुत आहे. ही ओळख भविष्यात अबाधित राखण्यासाठी साहजिकच नवं कलाकारांची पिढी समृद्ध होणं गरजेचे आहे. बालकलाकारांच्या अर्थातच शालेय विद्यार्थ्यांच्या अंगी सुप्त अवस्थेत दडलेल्या कलागुणांना वाव देण्याकरीता त्यांना स्पर्धात्मक रंगमंच मिळावा या उदात्त हेतूने गतवर्षी याहिवर्षी चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री ना. एकनाथजी शिंदे महाकरंडक मोठ्या थाटामाटात संपन्न होणार असून बीड जिल्ह्यातील मराठी/इंग्रजी माध्यमाच्या सर्व शाळांनी जास्तीतजास्त संख्येने सहभागी व्हावे असे कळकळीचे अहवान शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक आणि स्वप्नील भैय्या गलधर यांनी केले आहे. गतवर्षी नृत्य, नाट्य, संगीत, चित्रकला अशा विविध कलेच्या स्पर्धांना एकत्रित करून बीड शहरात जिल्हास्तरीय चंपावती महोत्सवाचे आयोजन केले होते. या महोत्सवासाठी बीड जिल्ह्यातील आकरा तालुक्यातील शेकडो शाळांमधील तब्बल ८४४४ बालकलाकार सहभागी झाले होते. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणारा चंपावती महोत्सव पुन्हा एकदा व्हावा अशी इच्छा जिल्ह्याभरातून बालक पालक तथा शाळा शिक्षकांनी व्यक्त करत होते. यामुळे पुन्हा एकदा यावर्षी भव्य दिव्य चंपावती महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

**उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब व खा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांना महोत्सवाचे निमंत्रण!**

महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब व संसदरत्न खासदार डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त बीडमध्ये दि ०१फेब्रुवारी २०२५ ते दि. ९ फेब्रुवारी २०२५ यादरम्यान संपन्न होणार असलेल्या जिल्हास्तरीय 'चंपावती महोत्सव उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे महाकरंडक' स्पर्धेचे निमंत्रण उपमुख्यमंत्री एकनाथजी शिंदे साहेब, खासदार डॉ.श्रीकांतजी शिंदे साहेब यांच्याबरोबरच सामाजिक न्याय मंत्री संजयजी शिरसाट साहेब, जलसंधारण मंत्री संजयजी राठोड साहेब यांना शिवसेना जिल्हाप्रमुख अनिलदादा जगताप, सचिन भैय्या मुळूक आणि स्वप्निल भैय्या गलधर यांनी भेटून निमंत्रण दिले व बालकलाकारांना प्रोत्साहन देण्याकरिता उपस्थित राहावे अशी विनंती केली.

----------

### सामाजिक ऐक्य व जातीय

बीडमधील वाल्मिक कराड हे धनंजय मुंडेंचे निकटवर्तीय मानले जात असून खंडणी प्रकरणात त्यांना अटक करण्यात आली आहे. तसेच, मोक्काअंतर्गतही कारवाई सुरू आहे. त्यामुळे, धनंजय मुंडेंच्या राजीनाम्याची मागणी केली जात आहे. धनजंय मुंडे हे गुंडांना सांभाळत असल्याचा आरोप त्यांच्यावर होत आहे. दरम्यान, श्री क्षेत्र गहिनीनाथ गड येथे वैराग्यमूर्ती संत श्रेष्ठ श्री वामन भाऊ यांच्या पुण्यतिथीच्या निमित्ताने आयोजित महापुजेस राज्याचे अन्न व नागरी पुरवठा मंत्री धनंजय मुंडे हे प्रतिवर्षीप्रमाणे उपस्थित राहिले. यावेळी आपल्या बीड जिल्ह्यातील सामाजिक ऐक्य व जातीय सलोखा कायम अबाधित राहावा अशी प्रार्थना धनंजय मुंडे यांनी श्री गहिनीनाथ महाराज व संत वामन भाऊ यांच्या चरणी केली असल्याचे धनंजय मुंडे म्हणाले. श्रीक्षेत्र गहिनीनाथ गड येथे आज संत वामन भाऊ यांचा ४९ वा पुण्यतिथी सोहळा साजरा केला जात आहे. मागील साधारण २० ते २५ वर्षांपासून पुण्यतिथीच्या दिवशीच्या महापूजेचा मान धनंजय मुंडे यांना आहे. दरवर्षीच्या परंपरेप्रमाणे याही वर्षी धनंजय मुंडे हे पुण्यतिथीच्या आदल्या दिवशी रात्रीच गहिनीनाथ गड येथे दाखल झाले. पहाटेच्या विशेष महापूजेनंतर धनंजय मुंडे यांनी माध्यमांशी संवाद साधताना श्रीक्षेत्र गहिनीनाथ गडाची ऊर्जा मला गोरगरिबांची सेवा करण्याचे बळ देते, असेही धनंजय मुंडे म्हणाले. दरम्यान, येथील दर्शनानंतर धनंजय मुंडेंना पत्रकारांनी प्रश्न विचारला असता, संतोष देशमुख यांच्या खुनाच्या घटनेचे प्रकरण फास्टट्रॅक कोर्टात चालवले पाहिजे आणि आरोपींना फाशीची शिक्षा दिली पाहिजे, असे मुंडेंनी म्हटले. मात्र, याप्रकरणी जास्त बोलण्याचे त्यांनी टाळले.

cmyk

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

गुरुवार, दि. २३ जानेवारी २०२५



## राज्यभरातून येणाऱ्या पत्रकारांसाठी सेलू नगरी सज्ज –हेमंत आडळकर

सेलू । प्रतिनिधी

मराठी पत्रकार परिषदेच्या राज्यातील सर्व तालुका पत्रकार संघाचा अध्यक्ष मेळावा व पुरस्कार वितरण सोहळ्यासाठी राज्यभरातून येणाऱ्या पत्रकारांच्या स्वागतासाठी सेलू नगरी सज्ज असून या शहराची ओळख सांस्कृतिक नगरी असल्याने हा सोहळा दिमाखदार होणार असल्याची माहिती साईबाबा नागरी सहकारी बँकेचे अदयक्ष हेमंत आडळकर यांनी दिली आहे.



मराठी पत्रकार परिषदेचा राज्यातील २५६ तालुक्यातील तालुका पत्रकार संघाचे अदयक्ष यांचा राज्यस्तरीय मेळावा आणि आदर्श तालुका पुरस्कार वितरण सोहळा दिनांक १ फेब्रुवारी २५ रोजी सेलू येथील साई नाट्य मंदिर येथे संपन्न होत आहेत या मेळाव्या बाबत आडळकर बोलत होते .ते पुढे म्हणाले की सेलू शहरात प्रथमच राज्यभरातून पत्रकार येत आहेत . सेलू शहरात त्यांच्या स्वागतासाठी कशाचीच कमतरता जाणवणार नाहीए. या ठिकाणी अद्यावत सभागृह,उत्तम निवास व्यवस्था आहे तसेच सेलूवासीय आदरतिथ्य करण्यात नेहमीच पुढाकार घेतात . या मेळाव्यातुन ग्रामीण स्तरावर काम करणाऱ्या पत्रकारांचे प्रश्न आणि समस्या यांची चर्चा होऊन ते मार्गी लावावेत अशी अपेक्षा आडळकर यांनी व्यक्त केली आहे .राज्यभरातुन येणाऱ्या पत्रकारांसाठी उत्तम व्यवस्था उपलब्ध करून देण्यासाठी आपण प्रयन्तशील आहोत असेही ते यावेळी म्हणाले.

# फुलसांगवीत सप्ताह सांगतेला भाविकांचा महापूर

## महाप्रसादाची पंगती; महंत जनार्धन महाराजांच्या कीर्तनाने सप्ताहाची सांगता

**शिरूर । शंकर भालेकर**

**श्री.संत वामनभाऊ महाराज यांच्या ४९ व्या पुण्यतिथीनिमित्त मौजे फुलसांगवी येथे गेल्या सात दिवसापासून मोठ्या आनंदी उत्साह मध्ये पार पडत असलेले अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता आज महंत जनार्दन महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली आहे. सांगतेच्या या कार्यक्रमासाठी संत –महंत, धार्मिक,सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, प्रशासकीय क्षेत्रातील मान्यवरांसह हजारोंच्या संख्येने फुलसांगवीनगरी भाविक –भक्तांचा महापूर आला होता. या उपस्थित भाविकांसाठी फुलसांगवी ग्रामस्थांच्या वतीने महाप्रसादाची संगती देण्यात आली आहे.**

वैराग्याचे महामेरू श्री संत वामनभाऊ महाराज यांच्या जन्मभूमी मध्ये ( फुलसांगवी येथे ) श्री.क्षेत्र मच्छिंद्रनाथ गडाचे मठाधिपती वै. महंत निगमानंद महाराज यांच्या प्रेरणेतून भाऊंच्या पुण्यतिथी निमित्त महाराजांच्याच मार्गदर्शनाखाली आरंभीत केलेला अखंड हरीनाम सप्ताहाचा आज वटवृक्ष झालेला पाहायला मिळत आहे. आपल्या गुरुवर्यांची परंपरा विद्यमान गुरुवर्य महंत जनार्दन महाराज यांनी सांभाळत या परंपरेला खत पाणी घालण्याचे काम चालवले आहे.याच परंपरेला अनुसरुण फुलसांगवीत गेल्या सात दिवसापासून महाराजांच्या प्रमुख उपस्थिती आणि मार्गदर्शनाखाली भव्य स्वरूपामध्ये अखंड हरीनाम सप्ताह व श्रीमद्भागवत कथा नामयज्ञ सोहळा मोठ्या थाटात पार पडत होता. त्याची सांगता आज महंत जनार्दन महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने झाली आहे.सप्ताह दरम्यान काकडा भजन, विष्णूसहस्त्रनाम गीतापाठ, तुकाराम महाराज गाथा भजन, हरिपाठ यासह हभप. ज्ञानेश्वर महाराज बोगीर (नाशिक )तुकाराम महाराज मुंडे (परळी ) महादेव महाराज राऊत( म्हाळस जवळा ) सुधाकर महाराज वाघ (पैठण ) रविदास महाराज सिरसाट (आळंदी



) योगीराज महाराज गोसावी (पैठण ) प्रभाकर महाराज बोधले आदी नामांकित कीर्तनकारांच्या कीर्तनाचे आयोजन केले होते. त्याच बरोबर दुपार च्या भाविक भक्तांना ज्ञानमृताचे प्रबोधन मिळावे यासाठी हभप. महंत रामेश्वर महाराज शास्त्री ब्रम्हसंस्थान येळंब यांची श्रीमद्? भागवत कथा आयोजित केली होती. ही कार्यक्रम श्रवण करण्यासाठी हजारोच्या संख्येने भाविक भक्त गेली आठ दिवस फुलसांगवी वास्तवास होती यामुळे फुलसांगवीनगरीत आनंदाला उधाण येऊन गोकुळाचे स्वरूप आले होते.या आनंदाच्या सोहळा सांगता आज महाराजांच्या कीर्तनाने झाली आहे. या सांगतेच्या कार्यक्रमाला हभप. महंत रामेश्वर महाराज शास्त्री, उद्धव महाराज शास्त्री, सुरेशानंद महाराज, महेशदेवा शास्त्री, हरी महाराज घाडगे, महादेव महाराज घुंगरड, गणेश महाराज जरांगे, दिनकर महाराज खामकर,नशिकेत महाराज जरे, लक्ष्मण महाराज जरांगे,गिरीधारी महाराज शेळके , हरिदेवा जहागीरदार, अंनत देवा धसे भाऊसाहेब महाराज इंगोले, माणिक महाराज मार्कड,जिप. सदस्य रामराव खेडकर, बबनराव गवते, इंजि.राहिदास पानसंबळ, योगगुरू अविनाश आर्य, मेजर चव्हाण नारायण पाटील देवकर, बाळासाहेब नागरे आदी सह धार्मिक, सामाजिक, राजकीय, प्रशासकीय मान्यवरांसह भाविक भक्तांचा महापूर आला होता. या सांगतेच्या कार्यक्रमानंतर गावकऱ्यांच्या वतीने बुंदी आणि चिवड्याच्या प्रसादाची महापंगती देण्यात आली आहे. या पंगतीचा भाविक भक्तांनी मोठ्या श्रद्धेने लाभ घेतला आहे.

### सप्ताह सांगतील लेकी बाळींची गर्दी

श्री संत वामनभाऊ महाराज यांची पुण्यतिथी म्हणजे एक परिसरासाठी मोठा धार्मिक उत्सव असतो. एरवी माहेरी येण्यासाठी वेळ नसणारे फुलसांगवी सह परिसरातील नांदायला गेलेल्या लेकी बाळी श्री संत वामनभाऊ महाराजांच्या पुण्यतिथी सोहळा उत्सवाला वेळ काढून हजेरी लावतात. भाऊंचा दर्शन घेऊन या ठिकाणी आपल्या सोयीनुसार राहून येथील कार्यक्रमाचे श्रवण करतात. विशेष म्हणजे बाल मैत्रिणी ही या उत्सवा निमित्तानं एकमेकीला भेटून हितगुज करत असतात. हे हितगुज करतानाचे लेकीबाळींचे घोळके आजही फुलसांगवी नगरीमध्ये पाहायला मिळाले.

### हा उत्सव पार पडल्याचा समाधान मोठ – महंत जनार्धन महाराज


फुलसांगवीतील सप्ताह सोहळ्याचा उत्सव निर्विघ्न पार पडल्यानंतर मनाला मोठे समाधान लागतं. गुरुदेव निगमानंद बाबांनी सुरू केलेली परंपरा हे सांभाळणं शिवधनुष्य जरी असलं तरी गुरुदेव निगमानंद बाबा आणि वामन भाऊ एक काम भाविक भक्तांच्या हातून मोठ्या उत्साहात पार पाडून घेतात.यामुळे हा कार्यक्रम पार पडल्यानंतर मनाला मोठा आनंद होऊन समाधान लाभत असल्याची प्रतिक्रिया श्रीक्षेत्र मच्छिंद्रनाथ गडाचे मठाधिपती महंत जनार्दन महाराज यांनी आमच्या प्रतिनिधीला दिली आहे

## शेतकऱ्यांच्या पोरांनी परिस्थितीवर मात करुन आई–वडिलांचे स्वप्न पूर्ण करावेत – सोजरबाई पौळ

गेवराई । प्रतिनिधी

मोबाईलमुळे आताची पिढी बदलत चालली असून आई बापानं आपल्या मुलांना लहान वयातच चांगले संस्कार द्यावेत. मोबाईलमुळे संवाद हरवत चालला आहे. तसेच शेतकऱ्यांच्या पोरांनी परिस्थितीचे भांडवल न करता परिस्थितीवर मात करत चांगले शिक्षण घेवून आपल्या आई–वडिलांचे स्वप्न पूर्ण करावेत असे प्रतिपादन आदर्श माता सोजरबाई आक्का पौळ यांनी व्यक्त केले.

केसूला बहुउद्देशीय सेवाभावी संस्था संचलित रायसीना इंग्लिश स्कूल, सुशी येथे शनिवार दि.१८ जानेवारी रोजी मकर संक्रांतीचे औचित्य साधून माता पालक मेळाव्याचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी त्या बोलत होत्या यावेळी व्यासपीठावर ग्रा.पं.सदस्या



सत्यशिला पौळ, संस्थेच्या संचालिका सोनाली राठोड सह आदी मान्यवर तसेच माता पालक मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. दरम्यान यावेळी माता पालकांमध्ये विविध स्पर्धा होवून मेळावा उत्साहात संपन्न झाला.

मेळाव्यात शालेय विद्यार्थ्यांनी स्वतः विविध खाद्यपदार्थ बनवून विक्रीसाठी आणले होते. त्यातून नफा आणि तोटा हि संकल्पना त्यांनी जाणून घेतली. तसेच माता पालकांसाठी हळदी कुंकू तसेच विविध स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये माता पालकांनी उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवून बक्षिसे मिळवली. तर आदर्श माता सोजरबाई आक्का पौळ यांनी आपल्या मुलांना उच्चशिक्षित बनविण्यासाठी कशाप्रकारे योगदान दिले याबाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक शाळेचे मुख्याध्यापक प्रा.विजय राठोड यांनी केले. तर सूत्रसंचालन भोसले मॅडम व चव्हाण सर यांनी केले. तर यशस्वीतेसाठी नीता मिस, रेणुका मिस, आकाश सर, अनिल सर बावस्कर सर ,तुरुकमारे सर , स्वप्निल माने यांनी परिश्रम घेतले.

## लालबहादूर शास्त्री विद्यालयाच्या स्नेहसंमेलनाचे थाटात उद्घाटन

परतूर । प्रतिनिधी

येथील लालबहादूर शास्त्री विद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे उदघाट सुप्रसिद्ध कवी केशव खटिंग यांच्या हस्ते बुधवारी पार पडले.संस्थेच्या संचालिका श्रीमती वर्षाताई आकात या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या तर प्राचार्य डॉ. भारत खंदारे,मुख्याध्यापक एल. के. बिरादार यांची यावेळी यांची उपस्थिती होती.प्रमुख पाहुणे म्हणून निवृत्त प्राचार्य डॉ. भगवानराव दिरंगे,प्रा.सखाराम टकले,साहित्यिक छबुराव भांडवलकर,एकनाथ कदम,मुख्याध्यापिका गिरी मॅडम, शिलजा मॅडम, सुरेश बहाड, आर्दड यांची उपस्थिती होती.

कवी खटिंग यांनी यावेळी एकापेक्षा एक सरस कविता सादर करून उपस्थितांची मने जिंकली.

झेंडा कोणाचा धरायचा नाही.... आस लागली संसाराची मनी गं... रानात राबतोय कुणबीणीचा धनी गं, लेक इतर कविता सादर त्यांनी



उपस्थितांची मने जिंकली. सर्व कविताना विद्यार्थ्यांनी टाळ्याच्या कडकडाटात प्रचंड प्रतिसाद दिला. आपल्या कवितामधून त्यांनी ग्रामीण जीवन, कष्टकरी जनता, ग्रामीण बोलीभाषा, आजचे आणि पूर्वीचे जीवन यातील फरक आवर्जून सांगितला. प्रारंभी विद्येची देवता सरस्वती, स्व. बाबासाहेब भाऊंच्या प्रतिमेचे पुजन करण्यात आले.

प्राचार्य बिरादार प्रास्ताविक करताना म्हणाले की, आमच्या लालबहादूर शास्त्री विद्यालयाचे स्नेहसंमेलन हे परतूरकरांसाठी आकर्षण असते. आम्ही दरवर्षी नामवंत लेखक, कवी यांना आवर्जून आमंत्रित करतो. कवी, लेखक यांना प्रत्यक्ष पाहण्याचा, ऐकण्याचा योग विद्यार्थ्यांना घडून येतो. या शिवाय विद्यालयात विविध क्रीडास्पर्धा घेतल्या जातात.

## भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त अंबाजोगाईत नवकेशर नृत्य महोत्सवाचे आयोजन
## नवकेशर डान्स ऍण्ड ड्रामा अकॅडमीचा वैयक्तिक व समुह नृत्य स्पर्धेसाठी पुढाकार

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी येथील नवकेशर डान्स ऍण्ड ड्रामा अकॅडमीने नेहमीप्रमाणेच पुढाकार घेतला आहे. भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त अंबाजोगाईत मंगळवार, दिनांक २८ जानेवारी रोजी नवकेशर नृत्य महोत्सवाअंतर्गत वैयक्तिक व समुहनृत्य स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे. अशी माहिती आयोजक भिमाशंकर शिंदे व प्रा.आरती भिमाशंकर शिंदे यांनी दिली आहे.**

याबाबत आमच्या प्रतिनिधीशी बोलताना आयोजक भिमाशंकर शिंदे यांनी सांगितले की, अंबाजोगाई शहरात मागील काही वर्षांपासून नवकेशर डान्स ऍण्ड ड्रामा अकॅडमीच्या वतीने विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच त्यांच्यातील कलागुणांना वाव देण्यासाठी सातत्यपूर्ण विधायक प्रयत्न करण्यात येत आहेत. अकॅडमीच्या अनेक विद्यार्थ्यांनी विश्व, देश, राज्य, विभाग, जिल्हा आणि तालुकास्तरीय विविध वैयक्तिक व समुह नृत्य स्पर्धांच्या माध्यमातून सहभागी होवून उज्ज्वल यश संपादन करीत अंबाजोगाईचे नांव उंचावले आहे. यापुढील काळातही नृत्य क्षेत्रात नवप्रतिभांना योग्य संधी, व्यासपीठ आणि मंच उपलब्ध करून देण्यासाठी यावर्षी पासून प्रथमच भारतीय प्रजासत्ताक दिनानिमित्त मंगळवार, दिनांक २८ जानेवारी रोजी आद्यकवि मुकुंदराज सांस्कृतिक सभागृह, अंबाजोगाई या ठिकाणी नवकेशर नृत्य महोत्सवाअंतर्गत वैयक्तिक नृत्य व समुहनृत्य स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.



हे या स्पर्धेचे पहिले वर्ष आहे. या स्पर्धा ४ गटांत आयोजित करण्यात आल्या आहेत. लहान गट इयत्ता १ ली ते ४ थी, मोठा गट इयत्ता ५ वी ते १० वी, खुला गट इयत्ता ११ वी पासून पुढील मुली व महिलांसाठी आणि दिव्यांग गटात शारीरिक अपंगत्व प्रवर्गातील सर्व विद्यार्थ्यांचा समावेश आहे. मंगळवार, दिनांक २८ जानेवारी रोजी सकाळी ११ वाजता भव्य वैयक्तिक नृत्य स्पर्धा तर दुपारी ३ वाजता समुहनृत्य स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी पुढीलप्रमाणे नियम व अटी आहेत. त्या अशा की, वैयक्तिक नृत्याप्रकारामध्ये विद्यार्थ्यांची पूर्वनिवड चाचणी (ऑडीशन) होईल. ज्या विद्यार्थ्यांचे निवड चाचणीमध्ये (ऑडीशन) निवड होईल त्यांनाच स्पर्धेत सहभाग दिला जाईल. वैयक्तिक नृत्यासाठी ३ मिनिटे तर समुह नृत्यासाठी ६ मिनीटे वेळ दिला जाईल. परीक्षकांचा निर्णय अंतिम राहिल. नांव नोंदणी शिवाय स्पर्धेत सहभाग घेता येणार नाही. गीत निवडण्याचे पुर्ण स्वातंत्र शाळांना व विद्यार्थ्यांना राहिल फक्त गीत अश्लील नसावे. ऐनवेळी स्पर्धेच्या नियमात कुठलीही पुर्वसुचना न देता बदल करण्याचे सर्व अधिकार आयोजक व संयोजकांकडे राहतील. प्रत्येक गटामध्ये प्रथम, द्वितीय, तृतीय या प्रमाणे पारितोषिके देण्यात येतील.

वैयक्तिक नृत्य स्पर्धेची निवड चाचणी शनिवार, दिनांक २५ जानेवारी २०२५ रोजी नवकेशर डान्स ऍण्ड ड्रामा अकॅडमी, अंबाजोगाई या ठिकाणी घेण्यात येईल. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी आयोजक भिमाशंकर शिंदे (९७६५१४४८७३), संयोजन समितीचे प्रा.अनंत कांबळे (८६००१३४००७), गणेश तौर (७०२०१६७४६५), सुशिल कुंबेफळकर (९४२१३३६८१९), विक्रमसेन आगळे (८३२९४७५२३९), सुनिल व्यवहारे (९३२५७६२८१७), बळीराम उपाडे (९९७०३८३८५६) यांच्याशी संपर्क साधावा. तसेच भव्य वैयक्तिक व समुहनृत्य स्पर्धेत जास्तीत जास्त शाळांनी व विद्यार्थ्यांनी आपला सहभाग नोंदवावा असे आवाहननवकेशर नृत्य महोत्सवाच्या आयोजकांकडून करण्यात आले आहे.

## मंठा तालुक्यातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक संपन्न

मंठा । प्रतिनिधी

मा,ना, एकनाथरावजी शिंदे उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते यांच्या २५ जानेवारी रोजी जालना दौरा असून या संदर्भात पूर्व नियोजनासाठी शिवसेना प्रमुख पदाधिकाऱ्यांची आज मंठा येथे शिवसेना संपर्क कार्यालय प्रल्हादराव बोराडे कॉम्प्लेक्स येथे बैठक घेण्यात आली यावेळी या बैठकीला संबोधित करताना शिवसेना उपनेते मुंबई आनंदराव जाधव साहेब, शिवसेना जिल्हाप्रमुख भाऊसाहेब जी घुगे, शिवसेना नेते मोहनजी अग्रवाल, संपर्क नेते विलास जी पारकर , संपर्क नेते राजेश जी मोरे , महिला आघाडी जिल्हाप्रमुख चंदाताई



शिंदे, शिवसेना तालुकाप्रमुख उदय दादा बोराडे, परतुर तालुका प्रमुख अमोल सुरंग, महिला आघाडी उपजिल्हाप्रमुख कासाबाई शिरगुळे, महिला आघाडी तालुकाप्रमुख सुनीता देशमुख, संगीता खराबे, सविता गवळी, तांबे ताई, मीरा सरकटे, बाबासाहेब चिखले, विलासराव शिंदे, योगेशराव गणगे, शिवाजी तरवटे, विजयकुमार गिरी, दीपक हिवाळे, आदी उपस्थित होते

## लोकनेते गोपीनाथराव मुंडे शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या संचालकपदी शेख मुबारक

**खालापुरी । प्रतिनिधी**

शिरूर कासार तालुक्यातील जी .प.च्या शिक्षकांची कामधेनु असलेल्या लोकनेते गोपीनाथराव मुंडे शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या स्वीकृती संचालक पदी खालापुरी येथील शिक्षक तथा माझी उपाध्यक्ष शेख मुबारक यांची नुकतीच सर्व संचालक मंडळांच्या विचार विनिमयानुसार निवड करण्यात आली.

शिरूर कासार तालुक्याची असलेली लोकनेते गोपीनाथराव मुंडे शिक्षक सहकारी पतसंस्था ही शिक्षकांचे अत्यंत काटकसरीने शिक्षकांचे हित जोपासणारी संस्था असून

शिक्षकांच्या आणि अडचणीला कामी येणारी संस्था आहे नुकत्याच झालेल्या संचालक मंडळाच्या झालेल्या बैठकीत अत्यंत होतकरू असलेले शिक्षक शेख मुबारक यांची स्वीकृती



संचालक म्हणून निवड एका पत्रकाद्वारे केली. त्यांच्या निवडीनंतर अध्यक्ष दिलीप दिलीप जायभाये, उपाध्यक्ष लखुळि मुळे, सचिव विष्णू मिसाळ ,संचालक मधुकर सानप, आनंत सानप,जीवन खेडकर सुभाष कंठाळे, परसराम खेडकर, विनायक कीर्तने ,सुभाष सांगळे ,संजय ढाकणे, भगवान माने गोरक्षनाथ मिसाळ, रंजना फुंदे, आलका बांगर यांनी यांनी स्वागत करून त्यांना शुभेच्छा दिल्या. लोकनेते गोपीनाथराव मुंडे शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या संचालक पदी मुबारक शेख यांची निवड झाल्याचे कळताच खालापूरी परिसरात त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

पान ६ वरून...

### विनयभंग केलेल्या

आरोपीस कलम ३५४ भा. द.वि.अन्वये दोषी ठरवून सहा महिने शिक्षा व दंड ४०००/– रुपये दंड अशी शिक्षा देण्यात आली.आरोपी यांचे वतीने सदर निकालाचे नाराजीने माजलगाव येथील ज्येष्ठ विधीज्ञ ॲड. व्ही.बी. लवटे यांचे मार्फत अतिरिक्त सत्र न्यायालय, माजलगाव येथे अपील दाखल केले.सदर अपीलामध्ये दोन्ही पक्षाचा युक्तिवाद ऐकून बी.जी. धर्माधिकारी न्यायाधीश यांनी आरोपी यांना प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी माजलगाव यांनी दिलेली शिक्षा रद्द करून आरोपीची सबळ पुराव्याअभावी निर्दोष मुक्तता केली.आरोपीच्या वतीने ॲड.व्ही.बी. लवटे,ॲड.एल.बी. गवते यांनी कामकाज पाहिले त्यांना ॲड.एस.डी.लंगे,ॲड. व्ही.एन.जुजगर यांनी सहकार्य केले.

### जि प आरोग्य सेवा कर्मचारी

जिल्हा कोषाध्यक्षपदी एड. मनोज माणिकराव वाघमारे, जिल्हा संघटक पदी संदिपान वामनराव मांडवे, जिल्हा उपाध्यक्षपदी कैलास शिवाजी गर्जे, वसंत विलास सानप, सय्यद जुबेर सय्यद ताहेर यांची तर महिला जिल्हाध्यक्षपदी श्रीमती बेबी दिगंबर बेद्रे यांची तर उपाध्यक्षपदी श्रीमती मनीषा प्रल्हाद कदम यांची निवड करण्यात आली .याबरोबरच राज्य कार्यकारिणीच्या विभागीय अध्यक्षपदी मनेंद्र सुदामराव बागलाने यांची सर्वानुमते निवड करण्यात आली. या निवडीबद्दल त्यांचे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांबरोबरच,संघटनेचे सदस्य, मराठी पत्रकार परिषदेचे संभाजीनगर विभागीय समन्वयक सुभाष चौरे, बीड जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके,जि.प.पाणी पुरवठा विभागाचे संजय मिसाळ, डॉ.सचिन बनसोडे आदींनी अभिनंदन केले.

### पिकअप ने दिलेल्या

समोर समोर झालेली ही धडक एवढी जबर होती की, मोटार सायकल वर मागे बसलेले राजेंद्र खेडकर हे पिकअप च्या टपावर फेकले गेले

या मोटारसायकल च्या मागे दुसऱ्या मोटारसायकल वर असलेले प्रमोद नीळकंठ खेडकर,आणि प्रशांत मोहन खेडकर यांनी या अपघातात जागीच मयत झालेल्या किरण रोहिदास खेडकर यांना खाजगी रुग्णवाहिकेद्वारा ग्रामीण रुग्णालय आष्टी येथे दाखल करून जखमी राजेंद्र खेडकर याला जामखेड येथील खाजगी रुग्णालयात दाखल केले या घटने बाबत मयत किरण रोहिदास खेडकर यांचे बंधू भाऊसाहेब रोहिदास खेडकर यांनी आष्टी पोलीस स्टेशन येथे फिर्याद देऊन महेंद्र बोलेरो पिकअप वाहन क्र.–१७––०९८७ या वाहनाच्या अज्ञात चालकाने त्याच्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, हयगयीने आणि निष्काळजीपणे चालवून भाऊ किरण रोहिदास खेडकर यास गंभीर जखमी करून मरणास आणि राजेंद्र खेडकर यास जखमी होण्यास आणि मोटरसायकलचे नुकसान करण्यास कारणीभूत ठरला आणि जखमींना अपघात स्थळावर मदत न करता जखमी अवस्थेत ठेवून पळून गेला म्हणून त्याच्याविरुद्ध कायदेशीर फिर्याद दिली आहे.. याबाबत आष्टी पोलीस स्टेशन येथे गु.र. क्र. ३८/ दि.२२/१/२०२५ अन्वये गुन्हा दाखल करून अज्ञात वाहन चालका विरोधात भारतीय न्याय संहिता २०२४ कलम १०६ (१), २८१, १२५ (), १२५ () आणि मोटार वाहन अधिनियम १९८८ कलम १३४ आणि १७७ अन्वये गुन्हा दाखल केला असून पोलीस हवालदार नवनाथ एकबाल काळे हे पुढील तपास करत आहेत.

### एस एम देशमुख यांनी केले

दामिनी दिलीप देशमुख या बीडच्या कन्येने दिनांक २६ जानेवारी रोजी प्रजासत्ताक दिनी दिल्ली राजपथावर होणाऱ्या परड साठी परेड कमांडर म्हणून निवड करण्यात आली आहे. दामिनी देशमुख ही एअर फोर्स मध्ये पायलट आहे दामिनी माजी न्यायमूर्ती दिलीपराव देशमुख यांची कन्या आहे .बीडच्या वैभवात चार चांद लावण्याचे काम या दोघींनी केलेले आहे. या दोघींच्या अभिनंदन करावे तेवढे थोडेच आहे. बीड जिल्ह्यामध्ये अनेक सकारात्मक गोष्टी आहेत. प्रचंड मेहनत करणारे लोक आहेत. मात्र त्याची चर्चा होत नाही.अशी खंत मराठी पत्रकार परिषदेचे विश्वस्त देशमुख यांनी व्यक्त केली.

बीडची लेक विश्वात एक–प्रा.सुरेश नवले

बीड जिल्ह्यात विश्वास विश्वात एक असे गौरवोजगार माजी मंत्री प्राध्यापक सुरेश नवले यांनी प्रियंका इंगळे यांनी मिळवलेल्या यशाबद्दल व्यक्त केले प्रियांका इंगळे हिचा आम्हा बीड करांना अभिमान असल्याचे प्राध्यापक सुरेश नवले यांनी म्हटले आहे.

### हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब

भगिनींना साडी वाटप, विविध प्राथमिक आरोग्य केंद्र येथे रुग्णांना फळ वाटप, विविध ठिकाणी विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात येणार आहे. उपजिल्हाप्रमुख आजिनाथजी खेडकर व शिरूर तालुका प्रमुख सोपान काका मोरे यांच्या आयोजित शिरूर येथे रांगोळी स्पर्धा व गोरगरीब महिलांचा हळदी कुंकवाचा कार्यक्रम घेऊन साड्या वाटप करण्यात येणार आहेत. पाटोदा उपतालुकाप्रमुख अशोक तात्या पवार यांच्या आयोजित तालुका पाटोदा आंबेवाडी व हांडेवाडी गावातील जिल्हा परिषद शाळेमध्ये सकाळी अकरा वाजता शालेय साहित्य वाटप होणार आहे. आष्टी तालुका प्रमुख सुभाषजी राऊत यांच्या आयोजित आष्टी येथे मुख व बधिर वस्तीगृहामधील सर्व विद्यार्थ्यांना सकाळी ११:३० वाजता अल्पउपहार देण्यात येणार आहे. युवासेना माजलगाव जिल्हा युवाधिकारी प्रदीपजी तांबे यांच्या आयोजित माजलगाव येथील शासकीय रुग्णालयात रुग्णांना सकाळी ११ वाजता फळ वाटप. धारूर तालुका प्रमुख बाबा सराफ यांच्या आयोजित धारूर येथील शासकीय रुग्णालयात सकाळी ११:३० वाजता रुग्णांना फळ वाटप करण्यात येणार आहे. युवासेना वडवणी तालुका युवाधिकारी नवनाथजी मोरे यांच्या आयोजित वडवणी मोरेवाडी गावातील जिल्हा परिषद शाळेमध्ये विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वही पेन वाटप करण्यात येणार आहे. शिवसेना जिल्हा संघटक रतन तात्या गुजर व शिक्षकसेनेचे जिल्हाध्यक्ष लक्ष्मण बहिरवाळ सर यांच्या आयोजित बीड शहरातील भगवान विद्यालय शेजारी ध्येयपूर्ती गुरुकुल येथे २० तारखेपासून सुरू असलेल्या वकृत्व स्पर्धा, रनिंग स्पर्धा, चित्रकला स्पर्धा,अशा अनेक स्पर्धांचे बक्षीस उद्या दिनांक २३ रोजी सायंकाळी ७ वाजता वितरण करून सर्व विद्यार्थ्यांना जेवणाची व्यवस्था केली आहे.याबरोबरच बीड जिल्ह्यातील व आष्टी माजलगाव विधानसभा मतदारसंघातील विविध ठिकाणी समाज उपयोगी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे,या सर्व कार्यक्रमाला शिवसेना,युवा सेना महिला आघाडी,किसान सेना,शिक्षक सेना सह सर्व अंगिकृत संघटनांच्या आजी–माजी पदाधिकारी व शिवसैनिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांनी केले आहे.

### जिवानं शिवाशी एकरुप

(भिलवडे) यांच्या अमृततुल्य काल्याच्या कीर्तनाने उत्साहात सांगता झाली. यावेळी ते बोलत होते. यावेळी माजी आ.अमरसिंह पंडित , पं.स.चे माजी सभापती कुमारभाऊ ढाकणे , शिवसेनेचे तालुकाप्रमुख शिनूभाऊ बेदरे, व्हॉईस ऑफ मीडियाचे जिल्हा उपाध्यक्ष विनोद नरसाळे, तालुकाध्यक्ष विनोद पौळ यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, संत–महंत तसेच गायक – वादक, टाळकरी हार्मोनियम वादक, विणेकरी, चोपदार आदि गुणीजन वृंद तसेच महिला व पुरुष भाविकांची लक्षणीय उपस्थिती होती. दरम्यान आठ दिवस महाराष्ट्रातील ख्यातनाम कीर्तनकारांची कीर्तन सेवा झाली.गायनाचार्य तुळशीराम म.आतकरे , इंद्रजित म.येवले , रामनाथ म. सालपे , नाना म.कवडे , बाळू म.बोदरे , ज्ञानेश्वर म. औटे , तर मृदंगाचार्य दत्ता म.सटले , अजय म.काळे , नामदेव म.बोंदरे , हार्मोनियम वादक उत्तम नाना मोटे , राजाभाऊ म.काळे तसेच माऊली दादा वारकरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थ्यांची साथ संगत लाभली कीर्तनानंतर भाविकांना महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. तर यशस्वीतेसाठी प्रतिष्ठानचे अध्यक्ष डॉ.संजय तांदळे, सचिव तथा जेष्ठ पत्रकार शिवाजीमामा ढाकणे, उपाध्यक्ष मुरलीधर शेंडेकर, कोषाध्यक्ष भास्करआण्णा ढाकणे, सह कोषाध्यक्ष किशोर जवकर, कार्याध्यक्ष गोपीनाथ घुले, विश्वस्त डॉ.सुभाष ढाकणे, विश्वस्त तथा मुख्याध्यापक बापुराव घुले , केंद्रप्रमुख अर्जुन बारगजे, उद्धव ढोक , डॉ. प्रशांत जायभाये , प्रविण फुलशंकर , परमेश्वर अंतरकर , अजित ढाकणे , विक्रांत घुले सह आदी पदाधिकाऱ्यांनी परिश्रम घेतले.

cmyk

# कृषी यांत्रिकीकरण उपअभियान योजनेचा तिसरा हप्ता मंजूर

## ट्रॅक्टर, यंत्र/अवजारे अनुदानाचा मार्ग मोकळा



केंद्र पुरस्कृत राष्ट्रीय कृषी विकास योजनेअंतर्गत कृषी यांत्रिकीकरण उपअभियानाच्या तिसऱ्या हप्त्यासाठी १५ कोटी १५ लाखा रुपयांच्या वितरणास राज्य सरकारने बुधवारी (ता.२२) मान्यता दिली आहे. त्यामुळे सर्वसाधारण, अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमाती प्रवर्गातील शेतकऱ्यांचा ट्रॅक्टर आणि इतर यंत्राचा लाभ मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. अनुदान रक्कम लाभार्थी शेतकऱ्यांच्या खात्यावर डीबीटीच्या माध्यमातून जमा करण्यात येणार असल्याची माहिती शासन निर्णयात देण्यात आली आहे.

२०२४-२५ या आर्थिक वर्षात राज्यातील पात्र शेतकऱ्यांसाठी केंद्र सरकारनं ९ कोटी ९ लाख रुपयांचा तर राज्याचा हिस्सा ६ कोटी ६ लाख रुपये असा एकूण १५ कोटी १५ लाख रुपयांचा निधी मंजूर केला आहे. मंजूर निधी कृषी आयुक्तांकडे वर्ग करण्यात आला आहे. यामध्ये सर्वसाधारण प्रवर्गासाठी ५ कोटी, अनुसूचित जातीसाठी ५ कोटी ६६ लाख ६७ हजार रुपये तर अनुसूचित जमातीसाठी ४ कोटी ४८ लाख ३३ हजार रुपयांची तरतूद करण्यात आली आहे.कृषि यांत्रिकीकरण उपअभियानातून एकूण आठ घटकांसाठी अनुदान दिलं जातं. त्यासाठी दोन घटकासाठी केंद्र सरकारचा हिस्सा १०० टक्के आहे. तर उर्वरित ६ घटकांसाठी केंद्र आणि राज्य शासनाच्या निधी हिश्श्याचे प्रमाण ६०: ४० असं प्रमाण आहे. या योजनेतून ट्रॅक्टरसाठी अनुसूचित जाती/ जमाती, महिला, अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांसाठी किंमतीच्या ५० टक्के किंवा १.२५ लाख या पैकी जे कमी असेल ते आणि इतर शेतकऱ्यांसाठी ४० टक्के किंवा १ लाख रुपये यापैकी जे कमी ते अनुदान दिलं जातं. दरम्यान, राज्य सरकारने या मंजूर अनुदानाचे वाटप योजनेच्या मार्गदर्शक सूचना अटी आणि शर्थींचं पालन करून करण्याचे निर्देश दिले आहेत.

## शेतातील गाजर गवतावर रामबाण उपाय



शेती करताना गाजर गवत हे शेतकऱ्यांची सर्वात मोठी डोकेदुःखी असते. एक वेळ शेतकऱ्यांना काही पिकांची माहिती नसते. मात्र हे गाजर गवत सर्व शेतकरी कुटुंबात लहान मुलाला देखील माहिती असते. मात्र हे गवत भारतात सर्वात प्रथम कुठे आढळून आले? ते कोणत्या देशातून भारतात आले? आणि या गवताच्या नायनाट करण्यासाठी काय उपाय आहेत? याबाबत अनेकांना माहिती नसते.

कृषी संशोधकांच्या उपलब्ध माहितीनुसार,गाजर गवत हे भारतात सर्वप्रथम १९५६ साली महाराष्ट्रातील पुणे या ठिकाणी आढळून आले होते. तेव्हापासून हे गवत शेतकऱ्यांना त्रासदायक ठरत आहे. हे गवत मूळचे मेक्सिको, अमेरिका, त्रिनिदाद आणि अर्जेंटीना या देशातील आहे. पहिल्या काळात हे गवत फक्त काही मोजक्या माळरान जमिनीवर दिसून येत होते. मात्र देशातील सर्व भागांमधील सर्व पिकात, फळबागांमध्ये, रस्ते, जंगल अशा ठिकाणी ते पसरले आहे. अमेरिकेतून या गवताचे बियाणे भारतात धान्यांमार्फत आल्याचे मानले जाते.

गाजर गवतामध्ये 'सेस्क्यूटरपीन लेक्टोन' नावाचे विषारी द्रव्य आढळून येते. ज्यामुळे शेतामध्ये हे गवत असल्यास त्याचा पिकांच्या उगवण व वाढीवर विपरीत परिणाम होतो. या तणामुळे जागोजागी लहान रस्ते, शेतांचे बांध पूर्णतः झाकोळून गेलेले दिसतात. या गवताच्या सानिध्यात बऱ्याचदा आल्यास माणसाला त्वचेचा आजार, ताप, दमा यांसारखे आजार होण्याची शक्यता असते. दुधाळ जनावरांनी गाजर गवत खाल्यास दूध उत्पादनात मोठी घट होते. या गवताची विशेषतः म्हणजे ते कोणत्याही वातावरणात आणि जमिनीमध्ये वाढू शकते.

कसे कराल नियंत्रण : या गवताला पांढऱ्या रंगाची फुले येतात. या गवताचे एक झाड जवळपास ५००० से २५००० काँग्रेस गवताचे बियाणे तयार करू शकते. हे बी हलके असते. त्यामुळे ते पावसाळ्यात पाणी, हवेमार्फत सहज एका जागेवरून दुसऱ्या जागेवर जाते. त्यामुळे या गवताला समूळ नष्ट करण्याचा सर्वात प्रभावी आणि रामबाण उपाय हा त्याला बियाणे येण्या आगोदरच उपटून टाकणे हा असतो. त्याला राउंड अप या विषारी तणनाशकाच्या वापराने देखील विशेष इजा होत नाही. ते पुन्हा डोकावते. त्यामुळे शेतकरी हे गवत उपटून एका जागी जमा करून त्यापासून सेंद्रिय खत तयार करू शकतात. हे सेंद्रिय खत पूर्णपणे सुरक्षित असते. त्यातून गाजर गवताचा कोणताही प्रसार होत नाही. त्याचे खतात रूपांतर होताना पूर्ण विघटन झालेले असते. या खतापासून पिकांना पोषक घटक मिळून उत्पादन वाढीस मदत होईल. त्यामुळे ज्या-ज्या ठिकाणी हे गवत आढळेल त्या-त्या वेळी बियाणे येण्याच्या आत त्यापासून सेन्द्रिय खत निर्मिती करावी. गाजर गवताचा नायनाटही होईल आणि पिकांना खतही मिळेल.

## दूध आणि मांसासाठी सिरोही शेळ्यांना देशभर पसंती

शेळी तज्ज्ञांच्या मते, काही काळापर्यंत देशात मांसासाठी शेळ्या-मेंढ्या पाळल्या जात होत्या. मात्र बाजारात शेळीच्या दुधाची मागणी अचानक वाढल्याने आणि विशेषत: कोरोनानंतर मागणी वाढल्याने दुधासाठी मोठ्या प्रमाणात शेळ्या पाळल्या जात आहेत. सिरोही हे राजस्थान मधील जिल्ह्याचे नाव आहे. शेळ्या-मेंढ्यांची एक विशेष जात सिरोही या नावाने ओळखली जाते. दूध आणि मांसासाठी शेळ्यांची ही खास जात देशभरात खूप पसंत केली जाते. सिरोही जातीची शेळी एका दिवसात ७५० ग्रॅम ते एक लिटर दूध देते. या जातीच्या शेळ्यांचे वजन ५० ते ६० किलो पर्यंत असते. ही जात लहान शेतकऱ्यांच्या शेळीपालनासाठी अतिशय चांगली मानली जाते. देशात आढळणाऱ्या ३७ शेळ्यांपैकी या जातीच्या संगोपनासाठी फारसा खर्च करावा लागत नाही, असे शेळी तज्ज्ञांचे म्हणणे आहे. विशेष म्हणजे मांसासोबतच देशात बकरीच्या दुधाचीही मागणी वाढत आहे. केवळ दुधावर खर्चाच्या कितीतरी पट नफा मिळतो.

सिरोही शेळीचा आकार

राजस्थान व्यतिरिक्त उत्तर प्रदेश आणि गुजरातमध्येही सिरोही जातीची शेळी आढळते. मात्र, आता भारताच्या इतर भागातही त्याचे पालन केले जात आहे. शोळखीबद्दल बोललो तर तो एक लहान आकाराचा प्राणी आहे. त्याच्या शरीराचा रंग तपकिरी असतो. शरीरावर हलके किंवा तपकिरी डाग देखील दिसतात. त्याचे कान सपाट व लटकलेले आहेत, तर शिंगे वाकलेली असतात. केस लहान आणि जाड. नर सिरोहीच्या शरीराची लांबी अंदाजे ८० सेमी आहे. तर मादीची लांबी अंदाजे ६२ सें.मी. तज्ज्ञ म्हणतात की तिच्या दोन मुलांना जन्म देण्याची ६० टक्क्यांहून अधिक शक्यता आहे.

अन्नाच्या बाबतीत सिरोही इतर शेळ्यांपेक्षा वेगळी : ही जात अतिशय जिज्ञासू स्वभावाची असल्याचे शेळी तज्ज्ञ सांगतात. त्याच्या खाद्याविषयी बोलायचे झाले तर, तो चवीला कडू, गोड, खारट किंवा आंबट अशा विविध प्रकारचा चारा खातो. तथापि, त्यांना लोबिया, बरसीम, लसूण इत्यादी शेंगायुक्त पदार्थ अतिशय चव आणि आनंदाने खायला आवडतात. त्यांना प्रामुख्याने चारा खायला आवडते. यामुळे सिरोही शेळ्यांना ऊर्जा आणि उच्च प्रथिने मिळतात. या जातीला अन्न क्षेत्रात लघवी करण्याची वाईट सवय देखील आहे, ज्यामुळे अन्न खराब होते. हे टाळण्यासाठी सिरोही परिसरात खास प्रकारचे खाद्य स्टॉल्स तयार करावेत.

सिरोही जातीला रोगांपासून वाचवण्यासाठी उपाय

तज्ज्ञांच्या मते, सिरोही शेळ्यांच्या आरोग्यासाठी काही खास टिप्सकडे लक्ष दिले पाहिजे. जन्मल्या नंतर बछड्यांना १५ दिवस आधी स्वच्छ, खुल्या आणि जंतूविरहित बछड्याच्या खोलीत ठेवण्यासाठी विशेष व्यवस्था करावी. जन्मानंतर ताबडतोब, कोकराचे संपूर्ण शरीर स्वच्छ आणि कोरड्या कापडाने स्वच्छ केले पाहिजे. जाळे त्याच्या नाक, तोंड आणि कानातून स्वच्छ केले पाहिजे. या शेळ्यांचे क्लोस्ट्रिडिअल रोगापासून संरक्षण करणे अत्यंत आवश्यक आहे. त्यासाठी लस दिलीच पाहिजे. जेव्हा मूल पाच ते सहा आठवड्यांचे असेल तेव्हा रोगाशी लढण्यासाठी लसीकरण करा.







### जागतिक दिवस
### राष्ट्रीय कुष्ठारोग प्रतिबंध अभियान दिवस

#### महत्वाच्या घटना

१५६५ : विजयनगर साम्राज्याची अखेर
१७०८ : छत्रपती शाहू महाराजांनी स्वत:ला राज्याभिषेक करवून घेतला. त्याच दिवशी सातारा ही राज्याची नवी राजधानी जाहीर केली गेली.
१७९३ : आजच्या दिवशी ह्यूमन सोसाइटी ऑफ़ फिलाडेल्फिया ला संघटीत केल्या गेले.
१८४९ : डॉ. एलिझाबेथ ब्लॅकवेल ही वैद्यकशास्त्रातील पहिली महिला पदवीधर बनली.
१९२७ : मॅडलिन ऑलब्राई ह्या अमेरिकेच्या पहिल्या महिला परराष्ट्र मंत्री बनल्या.
१९३२ : 'प्रभात'च्या 'अयोध्येचा राजा'ची हिन्दी आवृत्ती ' अयोध्याका राजा' मुंबईत प्रदर्शित झाली.
१९४३ : दुसरे महायुद्ध - ब्रिटिश सैन्याने त्रिपोली (लिबीयाची राजधानी) शहर जिंकले.
१९६६ : आजच्या दिवशी इंदिरा गांधी देशाच्या पहिल्या महिला प्रधानमंत्री बनल्या.
१९६८ : शीतयुद्ध उत्तर कोरियाने अमेरिकेची यू. एस. एस. प्युएब्लो ही युद्धनौका ताब्यात घेतली.
१९७३ : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष रिचर्ड निक्सन यांनी व्हिएतनाम बरोबर शांतता करार झाल्याचे जाहीर केले.
१९७७ : जयप्रकाश नारायण यांनी जनता पार्टी ची स्थापना केली.
१९९७ : मॅडलिन ऑलब्राईट या अमेरिकेच्या पहिल्या महिला परराष्ट्रमंत्री बनल्या.
२००२ : वॉल स्ट्रीट जर्नलचा पत्रकार डॅनिअल पर्ल याचे कराचीतुन अपहरण
२००२ : ला भारतीय उपग्रह इनसेट-३सी ला प्रक्षेपित केल्या गेले.
२००९ : ला टेलिव्हिजन कार्यक्रमांमध्ये धुम्रपानाच्या दृश्यांवरून बंदी हटवल्या गेली.

#### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८१४ : सर अलेक्झांडर कनिंगहॅम - भारतातील पुरातत्त्व संशोधनाची मुहूर्तमेढ करणारे ब्रिटिश अधिकारी (मृत्यू: २८ नोव्हेंबर १८९३)
१८९७ : नेताजी सुभाषचंद्र बोस (मृत्यू: १८ ऑगस्ट १९४५ फोर्मोसा, तैवान)
१८९८ : पं. शंकरराव व्यास - गायक व संगीतशिक्षक, पं. विष्णू दिगंबर पलुसकर यांचे शिष्य (मृत्यू: १७ डिसेंबर १९५६)
१९१५ : कमलनयन बजाज - उद्योगपती, जमनालाल बजाज यांचे चिरंजीव, बजाज आटो, बजाज इलेक्ट्रिकल्स, उदयपूर सिमेंट इ. कंपन्यांचे अध्यक्ष (मृत्यू: १ मे १९७२)
१९२० : श्रीपाद रघुनाथ जोशी - व्यासंगी लेखक (मृत्यू: २००२)
१९२६ : हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे (मृत्यू: १७ नोव्हेंबर २०१२)
१९३० : साहित्यामध्ये नोबेल पुरस्कार विजेते असलेले डेरेक वॉलकोट यांचा जन्म.
१९३४ : सर विल्यम हार्डी - ब्रिटिश जीवरसायनशास्त्रज्ञ (मृत्यू: ६ एप्रिल १८६४)
१९४७ : मेगावती सुकार्नोपुत्री - इंडोनेशियाच्या पहिल्या महिला राष्ट्राध्यक्ष
१९८७ : भारतीय चित्रपट कलाकार दुष्यंत वाघ चा जन्म.

#### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१६६४ : शहाजी राजे भोसले यांचे कर्नाटकातील होदेगिरीच्या जंगलात शिकार करताना घोडा अडखळून पडल्याने अपघाती निधन (जन्म: १८ मार्च १५९४)
१९१९ : राम गणेश गडकरी - नाटककार, कवी व विनोदी लेखक. ते 'गोविन्दाग्रज' या टोपणनावाने कथालेखन करीत तर 'बाळकराम' या नावाने विनोदी लेखन करीत. (जन्म: २६ मे १८८५)
१९३१ : ॲना पाव्हलोव्हा - 'द डाइंग स्वान' म्हणून प्रसिद्ध असलेली रशियन बॅलेरिना (जन्म: १२ फेब्रुवारी १८८१)
१९५९ : विठ्ठल नारायण चंदावरकर - शिक्षणतज्ज्ञ आणि कायदेपंडित.
१९६३ : ला भारतीय स्वातंत्र्य सैनिक नरेंद्र मोहन सेन यांचे निधन.
१९८९ : साल्वादोर दाली - स्पॅनिश चित्रकार. विसाव्या शतकात पिकासोच्या खालोखाल प्रसिद्धी व लोकप्रियता मिळवलेले चित्रकार म्हणून ते ओळखले जातात. (जन्म: ११ मे १९०४)
१९९२ : ह. भ. प. धुंडामहाराज देगलूरकर - भक्तिसांप्रदायिक आणि ज्ञानेश्वरीचे गाढे अभ्यासक.
२०१० : पं. दिनकर कैकिणी - शास्त्रीय गायक (जन्म: २ आक्टोबर १९२७)
२०१५ : ला सौदी अरेबियाचे राजे अब्दुल्ला यांचे निधन.

## शिमला मिरचीवरील रोग आणि प्रतिबंधात्मक उपाय

सिमला मिरची ही भारतातील खास भाज्यांपैकी एक आहे. त्याची लागवड शेतकऱ्यांना उत्पन्नाच्या दृष्टीने खूप फायदेशीर ठरू शकते. सिमला मिरची ही बहुमुखी आणि उच्च मूल्याची भाजी आहे. ज्याला स्थानिक आणि आंतरराष्ट्रीय बाजारात चांगली मागणी आहे.

सिमला मिरचीचे रोग : जिवाणूजन्य पानांचे ठिपके : या रोगाचा प्रादुर्भाव झाल्यानंतर सिमला मिरचीच्या पानांवर पिवळे प्रभामंडल असलेले लहान, पाण्यात भिजलेले ठिपके दिसतात, जे नंतर तपकिरी किंवा काळे होतात. हे टाळण्यासाठी रोग प्रतिकारक वाणांचा वापर करावा. वरून झाडांना पाणी द्या जेणेकरून पाणी पानांवर पडणार नाही. जमिनीत रोगजनकांना प्रतिबंध करण्यासाठी पीक लागवडीची जागा बदलत रहा. फायटोफथोरा ब्लाइट : हे देठ आणि फळांवर खोल पाण्यात भिजलेले जखम दाखवते. याच्या प्रभावामुळे पाने कोमेजून कुजण्याची लक्षणे दिसू शकतात. हे टाळण्यासाठी पिकाच्या आजूबाजूला पाणी साचू देऊ नका. पानांवर जास्त पाणी देणे आणि सिंचन टाळा. रोगाचा प्रसार रोखण्यासाठी संक्रमित झाडे काढून टाका. ज्यामध्ये, प्रतिबंधात्मक उपाय म्हणून मेटालॅक्सिल किंवा फोसेटाइल-ॲल्युमिनियम बुरशीनाशक वापरा.

व्हर्टिसिलियम विल्ट : पाने पिवळी आणि कोमेजतात. काही प्रकरणांमध्ये पाने पूर्णपणे मरतात. हे टाळण्यासाठी प्रमाणित रोगमुक्त बियाणे व रोपे वापरावीत. चांगल्या निचरा होणाऱ्या जमिनीत लागवड करा आणि जास्त सिंचन टाळा. जमिनीत रोगजनकांचा जमाव कमी करण्यासाठी पिके फिरवा. या रोगासाठी कोणतेही प्रभावी रासायनिक उपचार नाहीत, त्यामुळे प्रतिबंध आणि व्यवस्थापन धोरणांवर लक्ष केंद्रित केले जाते.

पावडर बुरशी : यामध्ये पाने, देठ आणि फळांवर पांढरे पावडर ठिपके दिसतात. हे टाळण्यासाठी, हवेच्या चांगल्या अभिसरणासाठी झाडांमध्ये पुरेसे अंतर ठेवा. झाडांभोवती ओलावा कमी करण्यासाठी ओव्हरहेड पाणी देणे टाळा. प्रतिबंधात्मक उपाय म्हणून सल्फर किंवा पोटॅशियम बायकार्बोनेट-आधारित बुरशीनाशक वापरा.

ॲफिडचा प्रादुर्भाव : ॲफिड हे लहान आणि मऊ शरीराचे कीटक आहेत जे वनस्पतींमधून रस शोषतात. यामुळे वाढ खुंटते आणि पाने विकृत होतात. हे टाळण्यासाठी, लेडीबग्स आणि लेसविंग्स सारख्या नैसर्गिक भक्षकांना प्रोत्साहन द्या. ॲफिड लोकसंख्या नियंत्रित करण्यासाठी कीटकनाशक किंवा कडुलिंबाच्या तेलाचा वापर करा. वनस्पतींभोवती ॲल्युमिनियम फॉइल ॲफिड्सला प्रतिबंध करू शकते. येथे लक्षात घेण्याजोगा मुद्दा असा आहे की जेव्हा वनस्पती रोगांचे व्यवस्थापन करण्याचा विचार येतो तेव्हा उपचारापेक्षा प्रतिबंध नेहमीच चांगला असतो. कोणतेही पीक रोगांपासून दूर ठेवण्यासाठी, योग्य स्वच्छता राखणे, रोग प्रतिरोधक वाणांचा वापर करणे आणि झाडे निरोगी ठेवण्यासाठी योग्य परिस्थिती प्रदान करणे आवश्यक आहे.



# लिंबागणेश येथील रोहित्रामध्ये बिघाड

## उच्चदाबाच्या वीजेमुळे घरगुती विद्युत उपकरणांचे नुकसान: रिकाम्या खुर्चीला हार घालुन ग्रामस्थांनी निषेध व्यक्त केला

लिंबागणेश। प्रतिनिधी

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील बसस्थानकावरील रोहित्राचा अचानक बिघाड झाल्याने अचानक उच्चदाबाच्या विजेमुळे अनेक घरातील घरगुती विद्युत उपकरणे जळुन ग्रामस्थांचे मोठ्या प्रमाणावर आर्थिक नुकसान झाले आहे. गावाला विद्युत पुरवठा करणाऱ्या तारा या झाडाझुडपातून आलेल्या असुन वारंवार तांत्रिक बिघाड होत असुन महावितरण कडुन योग्य देखभाल दुरुस्ती करण्यात येत नाही.गेल्या ३ महिन्यांपासून लिंबागणेश येथील सहाय्यक अभियंता पद गेल्या ३ महिन्यांपासून रिक्त असुन चौसाळा येथील सहाय्यक अभियंता अभिजित शिंदे यांच्याकडे अतिरिक्त पदभार देण्यात आलेला आहे. दीड महिन्यांपूर्वी रिक्त पद भरण्यात यावे यासाठी ग्रामस्थांनी रास्ता रोको आंदोलन करण्यात आले होते.अखेर आज डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली ग्रामस्थांनी श्रीफळ फोडून रिकाम्या खुर्चीला हार घालुन निषेध व्यक्त केला.यावेळी सरपंच बालासाहेब जाधव, सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ, माजी सरपंच मंडलिक , विक्की आप्पा वाणी, संतोष वाणी,संतोष भोसले, अशोक जाधव,संजय घोलप,रामकिसन गिरे,संजय सुकाळे, चंद्रकांत आवसरे, सर्जेराव मुळे, गणेश घाडगे, अनिल ढवळे , अशोक ढास आदि ग्रामस्थ उपस्थित होते.





बसस्थानक येथील रोहित्रामध्ये गेल्या आठवडाभरापासून बिघाड असल्याने शेतीला पाणी देणे तर दुरच पण जनावरांना पाणी पाजण्याची अडचण झाली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांची अडचण तातडीने दुर करावी. महावितरणच्या ढिसाळ कारभारामुळे ग्रामस्थ हैराण असुन त्याचा सर्वप्रथम मी निषेध करतो.विद्युत कर्मचारी मुख्यालयी रहात नाहीत त्यामुळे रात्री अपरात्री बिघाड झाल्यानंतर ग्रामस्थांनाच दुरुस्ती करावी लागते. तातडीने महावितरणने उपाययोजना न केल्यास तिव्र आंदोलन छेडण्याचा इशारा आम्ही महावितरणला देत आहोत. लिंबागणेश येथील ३३ केव्ही केंद्रातील सहाय्यक अभियंता पद ३ महिन्यांपासून रिक्त आहे.दीड महिन्यांपूर्वी मांजरसुंभा ते पाटोदा राज्य मार्गावरील लिंबागणेश बसस्थानक येथे रास्तारोको आंदोलन करण्यात आले होते. तेव्हा तातडीने पदाची भरती करण्यात येईल असे आश्वासन दिले होते. बसस्थानक येथील रोहित्रात बिघाड असल्याने घरामधील विद्युत उपकरणांमध्ये वीजप्रवाह उतरत आहे त्यामुळे भविष्यात जीवघेणा धोका उद्‌भवू शकतो याची गांभीर्याने दखल घ्यावी यासाठी आज रिकाम्या खुर्चीला हार घालुन निषेध व्यक्त केला.

## घर घर संविधान उपक्रम सर्वत्र राबवा
### सीइओ वर्षा मीना यांचे आवाहन

जालना। प्रतिनिधी

ग्रामपंचायत अधिकारी यांनी स्वयंस्फुर्तीने व स्वखर्चाने संविधान ची खरेदी करून प्रत घरोघरी वाटण्याचा जो उपक्रम सुरु केला आहे, तो अभिनंदनीय असून जिल्ह्यातील सर्व ठिकाणी हा उपक्रम राबवावा असे आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी वर्षा मीना यांनी केले आहे.मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनात संविधान वाटप उपक्रमाचे उद्घाटनप्रसंगी त्या बोलत होत्या. या वेळी जिल्हा परिषदेचे अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी शिरीष बनसोडे, प्रेमकुमार खिल्लारे , जनसंपर्क अधिकारी भगवान तायड यांची उपस्थिती होती.



भारतीय राज्यघटनेचे अमृत महोत्सवी वर्ष असल्या कारणाने घनसावंगी तालुक्यातील ग्रामपंचायत अधिकारी तथा ग्रामसेवक पथसंस्थेचे गजानन मुपडे , ग्रामपंचायत अधिकारी यांनी स्वखर्चाने २००० नग संविधान पुस्तिका वाटप करण्याबाबत नियोजन केले आहे. सदरील मोहिमेचे उद्घाटन सीईओ वर्षा मीना यांच्या हस्ते आज करण्यात आले. सदरील संविधान पुस्तिकेचे राणी उंचेगाव, पानेवाडी , रांजणी , मानेपुरी ,माहेर जवळा, हातडी, शेवता, राहेरा या ग्राम पंचायती मध्ये वाटप केले जाणार असून २६ जानेवारी–प्रजासत्ताकदिनी गावात जाहीर वाचन केले जाणार आहे. संविधान मुळे लोकांना आपले हक्क व कर्तव्याची माहिती मिळण्यास मदत होणार असून , हर घर तिरंगा या उपक्रम प्रमाणे सर्वांनी आपल्या सामाजिक बांधिलकीतून हा अभिनव उपक्रम आपआपल्या ग्रामपंचायतीत ग्राम पंचायत अधिकारी यांनी रावबावा असेही मत वर्षा मीना यांनी व्यक्त करून संबधित ग्राम पंचायत अधिकाऱ्याचे अभिनंदन केले.

## क्षेत्र महर्षी गौतम ऋषी संस्थान पालवण येथे प्रदक्षिणा सोहळा

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातीलच नव्हे तर मराठवाड्यातील प्रसिद्ध अशा श्री क्षेत्र महर्षी गौतम ऋषी संस्थान पालवण येथे ब्रह्मगिरी प्रदक्षिणा पौष वद्य षट्‌तिला एकादशी दि.२५ जानेवारी २०२५ वार शनिवार रोजी संपन्न होत आहे. संस्थानचे महंत महाराष्ट्रातील एक नामांकित कीर्तनकार भागवताचार्य श्री ह.भ.प.प.पू.गु.श्रीरंग महाराज डोंगरे यांच्या कल्पक व आचारशुद्ध नेतृत्वामुळे हे संस्थान अल्प कालावधीत नावारुपाला आले आहे.यांच्या मार्गदर्शनाखाली या संस्थानचा फार मोठा विकास झाला आहे.गेल्या दहा वर्षांपासून या तीर्थक्षेत्री हजारो भाविकांच्या उपस्थितीत ब्रह्मगिरी प्रदक्षिणा होत आहे.गत वर्षी ५०,००० पेक्षा अधिक भाविकांनी प्रदक्षिणा केली होती.बीड जिल्ह्यातीलच नव्हे तर मराठवाड्यातील भाविक मोठ्या संख्येने प्रदक्षिणेत सहभागी होतात.

हिंदू धर्मात ब्रह्मगिरी प्रदक्षिणेला अनन्यसाधारण महत्त्व आहे.महाराष्ट्रात श्री क्षेत्र त्र्यंबकेश्वर येथे ब्रह्मगिरी प्रदक्षिणा केली जाते.येथेही भगवान त्र्यंबकेश्वरांचे भव्यदिव्य मंदिर महंत श्री डोंगरे महाराज यांनी बांधले आहे.येथे त्रेतायुगात महर्षी गौतम ऋषी यांनी तप केले आहे.हे तीर्थक्षेत्र धाकटी ब्रह्मगिरी म्हणून प्रसिद्धीस आले आहे.बीड जिल्ह्याचे श्रद्धास्थान श्री क्षेत्र नारायण गडाच्या परंपरेतील हे तीर्थक्षेत्र आहे.नारायणगडाचे महंत वै.ह.भ.प.गु.माणिक बाबा यांना येथे गौतम ऋषींचा साक्षात्कार झाला.पुढे महंत वै.ह.भ.प.पू.गु.महादेव महाराज यांनी या संस्थानचा विकास करण्याचा संकल्प केला नंतर श्री क्षेत्र नारायण गडाचे विद्यमान महंत श्री ह.भ.प.प.पू.गुरुवर्य शिवाजी महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली आता मोठ्या प्रमाणात विकास कामे चालू आहे. प्रदक्षिणेच्या दिवशी पंचक्रोशीतील अनेक गावांतून भव्यदिव्य दिंड्या सहभागी होतात.मराठवाड्यातील सर्व भाविकांनी प्रदक्षिणा सोहळ्यात सहभागी व्हावे असे आवाहन संस्थानचे महंत श्री ह.भ.प.गु.श्रीरंग महाराज डोंगरे यांनी केले आहे.

## प्रभाग एक मधील स्वच्छतेचे तीन तेरा
### शिवसंग्राम महिला आघाडी आंदोलनाच्या पावित्र्यात

बीड। प्रतिनिधी

अनियमितपणे येणाऱ्या घंटागाडीमुळे शिंदे नगर परिसरात कचऱ्याचे साम्राज्य पसरले आहे. घंटागाडी नियमित येत नसल्याने नागरिक परिसरातील मोकळ्या जागेतच कचऱ्याची विल्हेवाट लावतात. त्यामुळे दुर्गंधी पसरली आहे. यासह नियमित पाणीपुरवठा या समस्येकडे नगरपालिका प्रशासनाचे दुर्लक्ष होत असून याबाबत त्वरित उपाययोजना करण्याची मागणी काल शिवसंग्रामच्या महिला आघाडी शहर उपाध्यक्षा संगीताताई ठोसर यांनी मुख्याधिकारी नीता अंधारे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.



शहरातील प्रभाग क्रमांक १ मधील अंबिका चौक ते शिंदे नगर फेज २ या परिसरात घंटागाडी नियमितपणे येत नाही. त्यामुळे जमा झालेला कचरा नागरिक आजूबाजूच्या परिसरात टाकतात. शिवाय या मार्गावर शाळा,मॉल,मंगल कार्यालये,बँका, व्यापारी संकुल असल्यामुळे रहदारी व वर्दळ जास्त प्रमाणात आहे. यातच रस्त्यावरील कचरा तसाच साचल्याने परिसरात दुर्गंधी पसरली आहे.शिंदे नगर फेज २ परिसरात असलेल्या मोकळ्या भूखंडांचा वापरही कचरा कुंडी म्हणूनच होत आहे. त्यामुळे आजूबाजूच्या परिसरात उग्र स्वरूपाचा वास आणि दुर्गंधी पसरली आहे. त्यामुळे डासांचे प्रमाणदेखील वाढले आहे. दुसरीकडे शहरात डेंग्यूसारख्या रोगाची साथ सुरू आहे. यामुळे लहान मुले तेथेच खेळतात, त्यामुळे आबालवृद्धाचे आरोग्यदेखील धोक्यात येत आहे.या संदर्भात महिला आघाडी शिवसंग्रामच्या शहर उपाध्यक्षा संगीताताई ठोसर यांच्या नेतृत्वात प्रभाग क्रमांक एक मधील महिलांनी बीड नगर परिषदेच्या मुख्याधिकारी नीता अंधारे यांना निवेदन देऊन त्वरित नियमित पाणीपुरवठा व नियमित घंटागाडीचे नियोजन करावे अशी विनंती केली. याप्रसंगी दुर्गा बाबासाहेब तुंबड,वर्षा गणेश बेंद्रे, राधा श्याम बेंदरे, रोहिणी सखाराम होंडे, सृष्टी विजय कुडके, आशा रामेश्वर राठोड, रूपाली निलेश शेटे, सुचिता निखिल शेटे,कोमल रामदास गवते, गीता निलेश ज्ञाने,गिरीजाबाई पांडुरंग विद्यागर, संध्या लांगोरे यांच्यासह परिसरातील अनेक महिला उपस्थित होत्या.


क्रमांक. २०२५/संकीर्ण/जन्म–मृत्यु नोंदणी/कावि–१९
कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार धारुर
दिनांक. १०/०१/२०२५

**जाहिरनामा**

**जन्म–मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र मिळणे बाबत**

**जन्म आणि मृत्युची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ अन्वये**

सर्व जनतेस मौजे, धारुर ता. धारुर जि. बीड यांना जाहिर केले जाते की, अर्जदार नामे श्री. राधाकिशन दत्तात्रय पोहनेरकर रा. धारुर ता. धारुर जि. बीड ह.मु. माऊंट न्यु अपारमेंट राजधानी नगर भावसिंगपुरा औरंगाबाद ता. जि. औरंगाबाद यांचे वडील नामे दत्तात्रय लक्ष्मण पोहनेरकर यांच मृत्यु दिनांक– २९/१२/१९६४ रोजी मौजे, धारुर ता. धारुर जि. बीड येथे झाला असुन अर्जदारांनी सदरहू मृत्युची कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणुन या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता सदरहू अर्जदाराचे वडीलांचे कायदेशीर मृत्युचे दिनांक कायदेशीर न्वहे असे कोणास समजविण्याचे असेल त हया जाहिरनाम्याचे प्रसिध्दी तारखेपासुन १५ दिवसाच्या आत त्याने हया कार्यालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरच असे कळविण्यात येते की जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार हयांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरह अर्जदारांचे मृत्युचे नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक. १०/०१/२०२५ रोजी माझे सही व शिक्यानिशी दिला.

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित
**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, धारुर**

क्रमांक. २०२३/संकीर्ण/जन्म–मृत्यु नोंदणी/कावि–२८५
कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार धारुर
दिनांक. ०३/१२/२०२४

**जाहिरनामा**

**जन्म–मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र मिळणे बाबत**

**जन्म आणि मृत्युची नोंदणी (सुधारणा) कायदा २०२३ मधील कलम ११ अन्वये**

सर्व जनतेस मौजे, असोला ता. धारुर जि. बीड यांना जाहिर केले जाते की, अर्जदार नामे श्रीम. गंगाबाई भ्र. भगवान बोबडे रा. असोला ता. धारुर जि. बीड यांचे दिर नामे ज्ञानोबा वामन बोबडे यांचे मृत्यु दिनांक १२/१२/१९६४ रोजी मौजे, असोला ता. धारुर जि. बीड येथे झाला असुन अर्जदारांनी सदरहु मृत्युची कायदेशीर नोंद असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळावे म्हणुन या कार्यालयात अर्ज दाखल केला आहे.

करिता सदरहु अर्जदाराचे दिराचे कायदेशीर मृत्युचे दिनांक कायदेशीर न्वहे असे कोणास समजविण्याचे असेल तर हया जाहिरनाम्याचे प्रसिध्दी तारखेपासुन १५ दिवसाच्या आत त्याने हया कार्यालयात हजर राहुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि हया लेखावरच असे कळविण्यात येते की जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखवल्या तर सदर कार्यालय सदरहु अर्जदार हयांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत झाल्यास त्यांना सदरहु अर्जदारांचे मृत्युचे नोंद कायदेशीर असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक–०३/१२/२०२४ रोजी माझे सही व शिक्यानिशी दिला.

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित
**कार्यकारी दंडाधिकारी तथा तहसीलदार, धारुर**

**मा.श्री. ओ.एन. मंत्री साहेब, ३ रे सह दिवाणी न्यायाधीश, व.स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज ११६/२०२५**

**कुंडाबाई भ्र. आण्णासाहेब बावळे विरूध्द निरंक**

अर्जदार: १. कुंडाबाई भ्र. आण्णासाहेब बावळे, वय ५१ वर्षे, धंदा– घरकाम, रा. नामलगांव ता.जि. बीड

विरुध्द निरंक

मागणी– बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट. १८२७ कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत राजाराम पि. वामनराव शिराळे, यांचा मृत्यु झाला, यांचे वारस असल्याबाबत वारस प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी मयत राजाराम पि. वामनराव शिराळे, यांचा मृत्यु दिनांक ०५/०१/१९९१ रोजी झाला आहे. यांचा मृत्यु वरील अर्जदारा व्यतिरिक्त मयतास इतर कोणीही कायदेशीर वारस नाहीत. मयत राजाराम पि. वामनराव शिराळे, यांच्या मृत्युनंतर वरील अर्जदारांना शासकीय व निमशासकीय कामासाठी सदर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदरहू अर्जदार सदरहू मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्यांचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट सदरहू अर्जदार हयांचे हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवून, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत राजाराम पि. वामनराव शिराळे, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक २२/०१/२०२५ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्कयाने दिले. सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. २५/०२/२०२५ आहे.

शिक्का

स्वाक्षरित
**क लिपीक**

आदेशावरून
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व. स्तर, बीड.

**मा.श्री. संजय टी. सहारे, २ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक: १२१/२०२५**

**(मार्फत विधिज्ञः– ॲड. एस आर उजगरे)**

अर्जदार :– १. लक्ष्मीबाई भ्र. संतराम चव्हाण, वय ६५ वर्षे धंदा घरकाम रा. सिध्देश्वर नगर, बहिरवाडी, ता. जि. बीड, २. कृष्णा पि. संतराम चव्हाण, वय ३३ वर्षे, धंदा मजुरी, रा. वरीलप्रमाणे, ३. धनंजय पि. संतराम चव्हाण, वय ३१ वर्षे, धंदा मजुरी, रा. वरीलप्रमाणे, ४. सचिन पि. संतराम चव्हाण, वय २६ वर्षे, धंदा मजुरी, रा. वरीलप्रमाणे,

विरुध्द निरंक

प्रकरण :– बॉम्बे रेग्युलेशन कायदा १८२७ चे कलम २ अन्वये वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत. ज्याअर्थी नामे संतराम पि. किसनराव चव्हाण हे दि. २१/०१/२०२२ रोजी बीड ता. जि. बीड येथे मयत झालेले असुन अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी आहे. तर अर्जदार क्र. २ ते ४ हे मयताचे मुले आहेत. मयतास मुलगी नाही. मयताचे आईवडील यापुर्वीच मयत झालेले आहेत. अर्जदारांशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत असे अर्जदारांचे म्हणणे आहे. अर्जदार असेही म्हणणे आहे की, शासकिय व निमशासकीय कार्यालयीन उपयोगा करीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे. त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे जाहिर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसाच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्का बाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याबद्यलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

आज दिनांक:– २१/०१/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

पुढील तारीखः ०३/०३/२०२५.

स्वाक्षरित
**क लिपीक**

शिक्का

आदेशावरून
स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व. स्तर, बीड.


## स्वच्छ भारत मिशन योजनेचा परळी नगर पालिकेने उडवला बोजवारा!
### प्रधानमंत्री आणि मुख्यमंत्री यांच्या आदेशाचा अवमान – राजेभाऊ फड

परळी। प्रतिनिधी

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि राज्याचे विद्यमान मुख्यमंत्री ना.देवेंद्र फडणवीस यांच्या दृष्टीने महत्त्वाकांक्षी असलेल्या स्वच्छ भारत मिशन योजनेचा परळी नगर पालिकेने बोजवारा उडवला आहे. स्वच्छ भारत मिशन योजनेच्या अंतर्गत झालेली कामे ही अत्यंत बोगस पद्धतीची आणि निकृष्ट दर्जाची झाली आहेत. याची चौकशी करून दोषींवर कार्यवाही केली पाहिजे अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे युवक नेते राजेभाऊ फड यांनी केली आहे.



परळी वैजनाथ नगर पालिका हा भ्रष्टाचाराचा केंद्रबिंदू झाला आहे. केंद्र आणि राज्य शासनाने जे स्वच्छ भारत मिशन अंतर्गत कामांसाठी नगर पालिका प्रशासनाला निधी उपलब्ध करून दिलेला होता. त्या निधीचा गैरवापर केला असल्याचे आता निदर्शनास येत आहे. बारा ज्योतिर्लिंगांपैकी पंचम स्थान असलेल्या प्रभू वैद्यनाथ नगरीची स्वच्छता केली जात नाही. परळी शहराला पावन भूमी प्रभू वैद्यनाथ यांचे वास्तव्य लाभल्याने देशातील आणि विदेशातील लाखो भाविक या शहरात येतात. मात्र ज्यांच्या हाती शासन आणि प्रशासनाच्या चाव्या होत्या त्यांनी शहराचे विद्रुपीकरण करण्याचा ठेका घेतला की काय? असा सवाल निर्माण होतोय. नगर पालिकेने शासनाच्या योजनेचा फज्जा उडवल्याचे चित्र आहे. सद्य स्थितीत नगर पालिका प्रशासनाने दुर्लक्ष केल्याने शहरात दुर्गंधी आणि रोगराईचे साम्राज्य पसरले आहे. म्हणजे शासनाच्या माध्यमातून निधी आणायचा आणि आपलेच गुत्तेदार पोसायचे हा नियम बनलेल्या परळी नगर पालिकेची शासनाने कसून चौकशी करावी अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते राजेभाऊ फड यांनी केली आहे. याबाबत नगरविकास विभाग आणि मुख्यमंत्री यांनाही तक्रार केली असल्याचे त्यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे.

## गहिनीनाथगडावरील भक्तीचा धागा सर्वांना बांधून ठेवणारा –जयदत्त क्षीरसागर

पाटोदा । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील गडाचे महत्व आणि महात्म्य फार मोठे आहे. प्रत्येक ठिकाणी लाखो भाविक जोडले गेले आहेत,गहिनीनाथ गड हा केवळ गडाचे महंत विठ्ठल महाराज यांच्या निस्वार्थ सेवेमुळे ओळखला जाऊ लागला आहे. इथे गरीब,श्रीमंत असा भेदभाव नाही,सर्वाना प्रेमाच्या धाग्यात बांधून ठेवत भक्ती मार्ग शिकवतात,त्यामुळे गहिनीनाथ गडावरील भक्तीचा धागा बांधून ठेवणारा आहे. संत वामनभाऊ यांची परंपरा विठ्ठल महाराज पुढे चालवत आहेत हे विशेष असल्याचे प्रतिपादन माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांनी केले. श्री क्षेत्र गहिनीनाथगड येथे संत वामनभाऊ यांच्या ४९ व्या पुण्यतीथी निमित्त ह.भ.प.आसाराम महाराज बडे यांचे कीर्तन प्रसंगी माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर उपस्थित होते. यावेळी गडाचे मठाधिपती महंत विठ्ठल महाराज, माजी आ.बाळासाहेब मुरकुटे, भीमराव धोंडे, डॉ.योगेश क्षीरसागर, भाजप जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख तसेच विविध पक्ष्याचे पदाधिकारी, मान्यवर उपस्थित होते.



यावेळी बोलताना माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर म्हणाले की, बालवयापासून संत वामनभाऊ यांनी बीड जिल्ह्यात वारकरी पताका खांद्यावर घेतली भगवान बाबा आणि संत वामन भाऊ हे दोघेही एकाच गुरुचे शिष्य म्हणून बीडसह राज्यात कीर्तनाच्या आणि भजनाच्या माध्यमातून वारकरी संप्रदायाचा प्रचार आणि प्रसार करत होते. आज गहिनीनाथगड हा महंत विठ्ठल महाराज यांच्या निस्वार्थ भावनेमुळे नावलौकिकास आला आहे. लाखो भाविक पुण्यतिथीच्या कार्यक्रमाला या ठिकाणी उपस्थित असतात. गडाच्या विकासासाठी सर्वजण प्रयत्न करत आहेत. गेल्या वर्षी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे देखील आले होते त्यांनी गडाला भरभरून निधी मंजूर केला आहे त्यामुळे या गडाचा विकास चांगल्या पद्धतीने होईल आणि भक्तांना सोयी–सुविधा उपलब्ध होतील. लाखो भक्तांची मांदियाळी या ठिकाणी जमली आहे. गडावरील भक्तीचा धागा हा सर्वांना बांधून ठेवणारा आहे.जी सेवा करण्याची संधी आम्हाला मिळाली ती आम्ही केली आहे, गडाचा विकास हा कुणाचा वैयक्तिक विषय नाही हा श्रद्धेचा आणि जिव्हाळ्याचा प्रश्न आहे. संत वामनभाऊंचा संस्कार आणि शिस्त यामुळे नवशक्ती निर्माण झाली आहे. भक्तीचा वापर समाजाला जोडण्यासाठी होतो ही फार मोठी गोष्ट आहे. संत वामनभाऊ यांच्या कृपेने बीड जिल्हा सुजलाम सुफलाम व्हावा. वारकरी संप्रदायाचा वसा आणि वारसा चालवत असताना समाजाला जागृत करण्याचे प्रयत्न केले जात आहेत. बीड जिल्हा अध्यात्माच्या श्रीमंतीने नटलेला असून परंपरेने वारी करणारा भक्त बीड जिल्ह्यात येणार्या पिढ्यांसाठी भक्ती आणि शक्ती यांचे दर्शन घडवून आणणारा आहे. मनातले प्रदूषण दूर करण्यासाठी परमेश्वराचे नामस्मरण महत्वाचे आहे. भाव आणि भक्तीचे सुरेल व सुरेख मिश्रण बीड जिल्ह्यात पाहायला मिळते असे सांगून त्यांनी उपस्थित भाविकांना संबोधित केले.यावेळी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्हाईस कॉल द्वारे संबोधित करून संत वामनभाऊ यांना अभिवादन केले.

राज्य लोकतंत्र
गुरूवार, दि.२३ जानेवारी २०२५ 

# शक्तीपीठ महामार्गाच्या विरोधात अंबाजोगाई तालुक्यातील शेतकरी आक्रमक

## शेतकऱ्यांना उद्ध्वस्त करणारा महामार्ग रद्द करण्याची मागणी

अंबाजोगाई । प्रतिनिधी

**राज्यातील बहुतांशी धार्मिक स्थळे जोडणाऱ्या नागपूर ते गोवा या शक्तीपीठ महामार्गासाठी अंबाजोगाई तालुक्यातील शेकडो एकर शेती संपादीत होत असल्याने अनेक शेतकरी कुटुंब उध्वस्त होणार आहेत. या बाधित होणाऱ्या शेतकऱ्यांनी एकत्र येत हा महामार्ग रद्द करावा अशी मागणी निवेदनाद्वारे मुख्यमंत्र्यांकडे केली आहे.**



राज्य सरकारने शक्तीपीठ महामार्ग पवनार ते पत्रादेवी (नागपुर गोवा) घोषीत केला आहे. या राज्यमहामार्गामध्ये अंबाजोगाई तालुक्यातील गीता, भारज, नांदगाव, वरवटी, पिंपळा, सायगाव या गावातील बहुतांशी शेतकऱ्यांच्या बागायती जमीनी संपादीत केल्या जाणार आहेत. त्यामुळे हे शेतकरी शक्तीपीठ महामार्गामुळे बाधीत होणार असून कायम स्वरुपी उद्ध्वस्त होणार आहेत. या सर्व शेतकऱ्यांची रोजीरोटी या शेतीवरच अवलंबून असल्याने त्यांच्यावर बेरोजगार होऊन उपासमारी आणि भूमिहीन होण्याची वेळ येणार आहे. हे सर्व जमीन धारक हे अल्प भुधारक असून या भागात शेतीशिवाय दुसरे कोणतेही उपजिवीकेचे साधन उपलब्ध नाही. या महामार्गामुळे बाधीत शेतकरी तसेच शेतमजूर बेरोजगार होऊन त्यांच्यावर उपासमारीची वेळ येणार आहे व त्यांचे संसार कायम स्वरुपी उद्ध्वस्त होऊन ते देशोधडीला लागणार आहेत. वास्तविक संपादीत होऊ घातलेल्या जमीनी या उच्च प्रतीच्या बागायती व उपजाऊ असल्या कारणाने संपादनामुळे देशाच्या उत्पंनात घट होऊन निसर्गाचीही प्रचंड हानी होणार आहे. तसेच महत्वाची बाब म्हणजे या संपादीत होऊ घातलेल्या बहुतांश जमीनी वरुन महावितरणची अतिउच्च दाबाची लाईन गेलेली असुन सध्या ती चालू स्थितीमध्ये कार्यरत असल्याने महामार्गासाठी पर्यायी भागाचा विचार करणे शासनाच्या दृष्टीने हिताचे आहे.

त्यामुळे प्रस्तावित शक्तीपीठ महामार्ग रद्द करुन पर्यायी भागाचा विचार करावा किंवा सध्या अस्तित्वात असलेल्या नागपुर ते रत्नागीरी किंवा इतर मार्गाचा विचार करुन शेतकऱ्याप्रती आपली सहानुभुती दाखवावी अशी मागणी शेतकऱ्यांनी उपजिल्हाधिकारी मार्फत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे. यापुर्वी देखील या महामार्गास वेळोवळी सनदशीर मार्गाने तीव्र विरोध दर्शविला आहे. परंतु त्याची दखल घेण्यात आलेली नाही. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी या प्रकरणात जातीने लक्ष घालून आम्हा शेतकऱ्यांचे व आमच्यावर अवलंबुन असलेल्या आमच्या कुटुंबीयांचे कायम स्वरुपी होणारे नुकसान टाळावे अशी विनंती देखील निवेदनात करण्यात आली आहे. यावेळी आंदोलक शेतकऱ्यांसमवेत कॉम्रेड अजय बुरांडे, ज्येष्ठ विधीज्ञ ऍड. बाबुराव तिडके, शेतकरी कामगार पक्षाचे भाई मोहन गुंड आदी उपस्थित होते.

# चौसाळा येथे भाजपा सदस्य नोंदणी कार्यक्रम संपन्न

चौसाळा । प्रतिनिधी

राष्ट्र प्रथम, त्यानंतर पक्ष आणि शेवटी स्वतः'' हा भारतीय जनता पार्टीचा मूलमंत्र मनात ठेवून पंतप्रधान आदरणीय नरेंद्र मोदीजी, केंद्रीय गृहमंत्री तथा सहकारमंत्री आदरणीय अमितभाई शाहजी, भाजपा राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय जे. पी. नड्डाजी, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री आदरणीय देवेंद्रजी फडणवीस आणि भाजपा महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष आदरणीय चंद्रशेखरजी बावनकुळे व भाजप नेते रवींद्रजी चव्हाण यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून भारतीय जनता पार्टी सदस्य अभियान राबविण्यात येत आहे. राज्यभरात २५ लाख सदस्य नोंदणीचे उद्दिष्ट साधण्यासाठी भाजपाकडून राज्यभरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात येत आहे. याच पार्श्वभूमीवर बीड जिल्ह्याच्या लोकनेत्या तथा राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन कॅबिनेट मंत्री नामदार .पंकजाताई मुंडे व मा. खासदार डॉ. प्रीतमताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली जिल्ह्यातील सर्व तालुक्यात भाजप सदस्य नोंदणीस नागरिकांचा उत्स्फूर्त असा प्रतिसाद मिळत



आहे. तसेच भाजपा जिल्हाध्यक्ष शंकरजी देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली चौसाळा येथे हर घर भाजपा .हर पल भाजपा, या उद्देशाने भाजपा सदस्य नोंदणीच्या कार्यक्रमाचे आयोजन चौसाळा गटाचे जिल्हा परिषद सदस्य तसेच बीड संयोजक मा. अशोक लोढा यांनी आठवडी बाजार बुधवार या दिवशी आयोजित केला. बाजार दिवशी परिसरातील शेतकरी ,व्यापारी तसेच सर्वसामान्य नागरिक महिलावर्ग यांची रहदारी जास्त असल्यामुळे या अभियानाला चांगल्या पद्धतीने प्रतिसाद मिळाला. सर्वसामान्य नागरिकांना सदस्य नोंदणी करण्यासाठी ८८०००२०४० या मोबाईल नंबर वर मिस कॉल द्या आणि भाजपा सदस्य व्हा ,असे अशोक लोढा व सर्व भाजपा पदाधिकारी यांनी नागरिकांना सांगितले . यावेळी अशोक दादा रसाळ (बीड ग्रामीण संयोजक) राहुल जोगदंड (मराठवाडा सोशल मीडिया संयोजक) अंकुश गोरे (सरपंच हिंगणी बुद्रुक) बाळासाहेब हावळे बापू कुचेकर ,पवन कुचेकर (अनुसूचित जाती तालुकाध्यक्ष) सलीम जहागीर (अल्पसंख्यांक तालुकाध्यक्ष) राजू शहाणे (सोशल मीडिया बीड) अण्णा मामा तोडकर , राहुल मुळे , शेख अझरुद्दीन ,किशोर ढोकणे ,विश्वास नाईकवाडे, संतोष नाना नाईकवाडे ,सचिन मस्के ,सुहास झोडगे ,महादेव चौधरी , सुधाकर मुळे ,लक्ष्मण कोकणे रवी सुकाळे ,अर्जुन चौधरी, मोहन आबा जोगदंड, बंटी चौधरी, चंदन सोनवणे , गणेश गिरी , रवी सोनवणे यादी पदाधिकारी उपस्थित होते.

# राष्ट्रीय सेवा योजना शिबिरात आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा येथील जय भवानी कला व विज्ञान महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना शिबिरात मोजे बांगरवाडी येथे आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले या शिबिराचे प्राचार्य डॉक्टर विश्वास कदम यांच्या मार्गदर्शनाखाली व महाविद्यालयाचे प्राचार्य प्राध्यापक सोमनाथ घाडगे यांच्या उपस्थितीत प्रमुख पाहुणे म्हणून डॉक्टर तोटे साहेब प्राध्यापक सौ कल्पना घारगे मॅडम डॉक्टर प्रधान आर जे प्राध्यापक मांजरे पी एस वसंतदादा पाटील महाविद्यालय पाटोदा तसेच प्राध्यापक उजगरे सर प्राध्यापक बजरंग दिसले सर कार्यक्रमाधिकारी प्राध्यापक डॉक्टर शिवाजीराव काकडे प्राध्यापक डॉक्टर लोखंडे सर उपस्थित होते या शिबिरात मोजे बांगरवाडी येथील ज्येष्ठ नागरिक व शाळेतील विद्यार्थ्यांची आरोग्य तपासणी करण्यात आली या या शिबिरात २५ ते ३० लोकांच्या



ज्येष्ठ नागरिकांची आरोग्य तपासणी

आरोग्यांची तपासणी करण्यात आली व शाळेतील २० विद्यार्थी सहभागी झाले शिबिरात दीपाताई काळे अजय शिंदे वैभव सस्ते विशाल काळे नारायण काळे स्वयंसेवक अभिषेक वार भवन शेख तोफिक सौ केशरबाई रुपनर यांची आरोग्य तपासणी करून गावातील महिला पुरुष लहान मुले यांची आरोग्य तपासणी करण्यात आली प्राथमिक उपचार म्हणून औषधे व गोळ्या चे वाटप करण्यात आले कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी कार्यक्रम अधिकारी डॉक्टर काकडे डॉक्टर लोखंडे श्री विशाल काळे उमाजी काळे अरुण काळे यांनी सहकार्य केले डॉक्टर तोटे यांनी आपले मार्गदर्शक पर विचार मांडताना अशी शिबिराच्या माध्यमातून गावकऱ्यांनी आपल्या आरोग्याची काळजी घेऊन सकस आहार सेवन केला पाहिजे व आरोग्य चांगले ठेवले पाहिजे कोणताही आजार अंगावर काढू नये अशी आव्हान डॉक्टर तोटे यांनी केले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी श्री कुणाल काळे गावातील नागरिक यांनी मोलाचे सहकार्य केले शाळेचे मुख्याध्यापक कुडके सर घुमरे मॅडम ईश्वर काळे यांनीही सहकार्य केले

# विनयभंग केलेल्या आरोपात झालेली शिक्षा अपिलात रद्द

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील पुरुषोत्तमपुरी येथील फिर्यादीने गोपीनाथ काळे यांचे विरुद्ध ग्रा.पो. स्टेशन माजलगाव येथे विनयभंग केल्या प्रकरणी दिनांक २७ डिसेंबर २०१२ रोजी फिर्याद दिली त्यानुसार आरोपी विरुद्ध गु.र.नं. १७२/२०१२, कलम ३५४,३२३,५०४,५०६ भा.द.वी अन्वये



गुन्हा दाखल झाला. त्यानंतर सदर प्रकरणात तपासी अंमलदार यांनी प्रकरणाचा तपास पूर्ण करून आरोपी विरुद्ध प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी माजलगाव येथील न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले.सदर प्रकरणात सरकार पक्षाच्यावतीने पाच साक्षीदार तपासण्यात आले त्यानंतर प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी माजलगाव यांनी ◀◀ पान ३ वर

# जिल्हा कृतीदल बालविवाह बैठक संपन्न

बीड । प्रतिनिधी

**जिल्हा कृतीदल व बालविवाह बैठकीचे जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली बालविवाहाचा आढावा घेण्यासाठी बैठक आयोजित करण्यात आली होती. जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रगती सभागृहात बैठक संपन्न झाली.**

प्रस्ताविक करतांना जिल्हा महिला बालविकास अधिकारी म्हणाले की, बालविवाह करणारे आईवडील व नातेवाईक यांना २ वर्षाचा कारावास होऊ शकतो. बालविवाहाविषयी अधिनस्त यंत्रणेने कार्यशाळा, रॅली, विविध स्पर्धा, रांगोळी, चित्रकला यामधून जनजागृती करावी. बालसंरक्षण समित्या स्थापन कराव्यात, बालविवाहाचा लोगो प्रत्येक शासकीय पत्रावर ठेवावा, बालविवाह रोखण्यासाठी चाईल्ड लाईनची मदत घ्यावी. संबधित यंत्रणेने बालविवाह संदर्भातील माहितीचा अहवाल जिल्हाधिका-याकडे वेळोवेळी सादर करावा.

या बैठकीस जिल्हा परविक्षा अधिकारी मंगेश जाधव,चाईल्ड हेल्पलाईनच्या जिल्हा समन्वयक अश्विनी जगताप तसेच संबधित अधिकारी उपस्थित होते.वरिष्ठ प्रकल्प समन्वयक बालविवाह (युनिसेफ) च्या सोनिया हंगे, यांनी दुरदृश्य प्रणालीव्दारे बालविवाहाविषयी करावयाच्या उपाययोजना व जानजागृती विषयी माहिती दिली.प्रस्ताविक व आभार प्रदर्शन जिल्हा महिला बालविकास अधिकारी, एफ.एम.शेख यांनी केले.

# शौर्य शैलेश जाधव यांची महाराष्ट्राच्या १४ वर्षाखालील मुलांच्या क्रिकेट संघात निवड

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील दोन खेळाडूंची १४ वर्षाखालील महाराष्ट्र क्रिकेट संघात निवड झाली ही बातमी अतिशय अभिमानास्पद आहे आपल्या जिल्हयाचा खेळाडू शौर्य शैलेश जाधव हा वयाच्य सहाव्या वर्षापासून क्रिकेटचा सराव करतो आहे आणि त्याची मेहनत व प्रशिक्षक शेख



अजहर, संजय धस, सागर सांगळे यांच्या मार्गदर्शना मुळे तसेच महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे सदस्य तथा बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सेक्रेटरी आमेर सलीम याचा जिल्ह्यातील सर्व खेळाडूंना आसलेला खंबीर पाठिंबा यामुळे शौर्यने महाराष्ट्र संघात आपले स्थान निर्माण केले आहे त्यांने प्रथम बीड जिल्हा कडून खेळताना ९ सामन्यात सर्वाधिक ७६१ धावा करत महाराष्ट्रातील पहिल्या पाच मुलांत आपली जागा निर्माण केली त्यांनतर महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यातील सर्वाधक धावा करणारे व गोलंदाजीत गडीबाद करणारे जवळपास ८० मुले निवडून त्यांचे सामने महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनचे सलेक्टर व कोच यांच्या समोर पाच सामने खेळवण्यात आले यात देखील शौर्य जाधव याने चार आर्धशतके करत २९७ रन्स करत सर्व मुलांत आपले दुसरे स्थान कायम राखले व पुढील निवडक चोवीस मुलांच्या कॅम्प मध्ये खेळण्यास पात्र ठरला यानंतर आपल्या कौशल्यावर त्यांने यामुलांत देखील चांगली कामगिरी केल्या कारणांने महाराष्ट्राच्या संघात शौर्य जाधवची निवड झाली आहे. या निवडीनंतर बीड जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे सचिव आमेर सलीम, राजन साळवी, इरफान कुरेशी, जावेद पाशा,रिजवान भाई, गोपाल गुरखुदे, नासेर मोमीन,शाहरूख पठाण, अतिक कुरेशी, निसार तांबोळी, सुनिल वाघमारे,रोहित जाधव,मोहीत परमार,चंद्रकांत हरकूडे,संतोष कवटेकर, प्रकाश गालफाडे, सुदामजी शेळके, बाबासाहेब गोरे, विजय पिव्हाळ,संजय कुलकर्णी, सखाराम घोडके,राजेश घनघाव,यांच्यासह बीड जिल्हा वकील क्रिकेट संघाने शौर्यला शुभेच्छा देत महाराष्ट्र संघाकडून चांगले खेळण्यासाठी अशिर्वाद दिले.शौर्य जाधवला ज्येष्ठ प्रशिक्षक अजहर शेख, संजय धस, सागर सांगळे, फिटनेस कोच नासेर मोमीन,राहूल जाधव, यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभत आहे.

# पिकअपने दिलेल्या धडकेमुळे किरण खेडकर यांचा अपघाती मृत्यू

आष्टी (प्रतिनिधी)

आष्टी ते जामखेड रस्त्यावरील आष्टा (हरिनारायण) फाट्याजवळ पिकअप या वाहनाने समोरून येत असलेल्या मोटार सायकलला जोरदार धडक दिल्याने मोटरसायकल स्वार जागीच मृत्यू पावला असून मागील इसम जबर जखमी झाला आहे

याबाबत सविस्तर हकीकत अशी की, आष्टी तालुक्यातील सांगवी (आष्टी) येथील रहिवासी असलेले किरण रोहिदास खेडकर आणि राजेंद्र लालासाहेब खेडकर हे दि २० जानेवारी रोजी रात्री ९ ते ९.३० च्या



सुमारास मामाचे गाव असलेल्या बांदखडक ता.जामखेड येथून सांगवी (आष्टी) गावाकडे परत येत असता आष्टी ते जामखेड रस्त्यावरील आष्टा हरिनारायण या फाट्याजवळ समोरून येत असलेल्या महेंद्र बोलेरो पिकअप क्र.-१७--०९८७ चालकाने -१२--१४२७ ही मोटारसायकल चालवत असलेल्या किरण रोहिदास खेडकर (वय ३८) आणि मागे बसलेल्या राजेंद्र लालासाहेब खेडकर (वय ३६) यांना जोरदार धडक दिल्याने मोटर सायकल चालवत असलेले किरण रोहिदास खेडकर हे जागीच मरण पावले तर मागे बसलेले राजेंद्र लालासाहेब खेडकर हे गंभीर जखमी झाले आहेत ◀◀ पान ३ वर

# हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त जिल्ह्यात विविध ठिकाणी सामाजिक उपक्रम–सातपुते

बीड । प्रतिनिधी

हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख माननीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त बीड जिल्ह्यामध्ये विवीध ठिकाणी सामाजिक उपक्रम राबवून जयंती साजरी करण्यात येत आहे आसे जिल्हा प्रमुख परमेश्वर सातपुते यांनी सांगितले आहे..



शिवसेना पक्षप्रमुख सन्माननीय उद्धवजी ठाकरे साहेब यांच्या आदेशाने व युवासेना प्रमुख आदित्यजी ठाकरे साहेब,शिवसेना नेते तथा शिवसेना सचिव विनायकजी राऊत साहेब,शिवसेना नेते सुनीलजी प्रभू साहेब, शिवसेना नेते तथा विरोधी पक्षनेते अंबादास दानवे साहेब, शिवसेनेचे मराठवाडा समन्वयक विश्वनाथजी नेरूळकर साहेब, बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव साहेब,सह संपर्कप्रमुख बदामराव आबा पंडीत साहेब,सह संपर्कप्रमुख डॉ.लक्षराज सानप साहेब,सह संपर्कप्रमुख बाळासाहेब अंबुरे साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली व शिवसेनेचे जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्यात आष्टी व माजलगाव विधानसभा मतदारसंघांमध्ये विविध समाज उपयोगी कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.

दिनांक २३/१/२०२५ रोजी सकाळी ठीक दहा वाजता शिवसेना जनसंपर्क कार्यालय बार्शी रोड बीड येथे हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांच्या प्रतिमेचे पूजन करून सर्व पदाधिकारी व शिवसैनिक त्यांना मानवंदना करतील व यानंतर वडवणी येथील आनंद कॉम्प्लेक्स संभाजी महाराज चौक या ठिकाणी हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख माननीय बाळासाहेब ठाकरे यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन करून, वडवणी तालुका प्रमुख विनायक बप्पा मुळे यांच्या आयोजना खाली ऊसतोड कामगार ◀◀ पान ३ वर

# जि.प.आरोग्य सेवा कर्मचारी संघटनेच्या जिल्हाध्यक्षपदी भारत नागरगोजे

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद आरोग्य सेवा कर्मचारी संघटनेच्या बीड जिल्हा अध्यक्षपदी भारत ज्ञानोबा नागरगोजे यांची राज्याचे अध्यक्ष अरुण खरमाटे यांनी निवड केली. यासंदर्भात मराठवाडा प्रमुख शिवाजीराव कवचट यांना पत्र देऊन बीडची कार्यकारणी घोषित करण्यात आली.



महाराष्ट्र राज्य जिल्हा परिषद आरोग्य सेवा कर्मचारी संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची बैठक राज्याचे अध्यक्ष अरुण खरमाटे यांच्या अध्यक्षतेखाली व मराठवाडा प्रमुख शिवाजीराव कवचट यांच्या प्रमुख उपस्थितीत बुधवारी होऊन या बैठकीत जिल्हा कार्यकारणीला मान्यता देण्यात आली. संघटनेच्या जिल्हा अध्यक्षपदी भारत नानोबा नागरगोजे, कार्याध्यक्षपदी किशोर मारुती जाधव, जिल्हा सरचिटणीस पदी साजिद कादर शेख, ◀◀ पान ३ वर

# एस एम देशमुख यांनी केले प्रियंका इंगळे, दामिनी देशमुख यांचे अभिनंदन

**बीड । प्रतिनिधी**

मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस.एम.देशमुख यांनी बीडच्या कन्या असलेल्या खो-खो च्या कप्तान प्रियांका इंगळे आणि येत्या प्रजासत्ताक दिनी राजपथावर परेड कमांडर म्हणून निवड झालेल्या दामिनी देशमुख या दोन्ही कन्यांचे अभिनंदन केले आहे.





त्यांनी आपल्या ट्विटमध्ये म्हटले आहे की बीडमध्ये अनेक सकारात्मक गोष्टी घडतात. मात्र जाणीवपूर्वक नकारात्मक प्रसिद्ध केल्याने. देशाच्या खो-खो संघाला वर्ल्डकप जिंकून देणारी मुलगी ही मूळची बीडची प्रियांका इंगळे हिणे देशाला वर्ल्डकप मिळवून दिला. याचा संपूर्ण बीड जिल्ह्याला अभिमान आहे. तिचे कौतुक करावे तेवढे थोडेच आहे. याबरोबरच देवडी येथील रहिवासी असलेल्या ◀◀ पान ३ वर

# जिवानं शिवाशी एकरुप होणं म्हणजे काला होय – गणेश महाराज शास्त्री

गेवराई । प्रतिनिधी

संत भाऊ -बाबा हे थोर महान तपस्वी सिद्ध पुरुष होते. संताच्या सेवेने जीवन समृद्ध होते. संतांच्या सानिध्यात सर्व चिंता नष्ट होतात जीवनात त्याग केल्याशिवाय चांगल्या गोष्टींची प्राप्ती होत नाही. तर षडरिपू , आशा , वासना , तृष्णा हे जे दोष आहेत ते मानवाच्या कल्याणाआड येतात म्हणून आपण त्यापासून जर मुक्त झालोत त्यांचा त्याग केला तर माणसाचं जीवन सार्थकी लागून मोक्ष प्राप्ती मिळते तसेच अंतःकरण निश्चिंत राहते. तर जिवानं शिवाशी एकरुप होणं म्हणजे काला होय असे प्रतिपादन दुर्गाशक्तीगडाचे मठाधिपती ह.भ.प.गणेश महाराज शास्त्री यांनी व्यक्त केले.



संत भाऊ– बाबांच्या पुण्यतिथीनिमित्त हजारो भाविकांची उपस्थिती

गेवराई येथील संत भाऊ-बाबा सेवा प्रतिष्ठानच्या वतीने वै. गुरुवर्य संत भगवानबाबा व वै.संत वामनभाऊ महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त २० व्या भव्य कीर्तन महोत्सवाची बुधवार दि.२२ जानेवारी रोजी दुर्गाशक्तीगडाचे मठाधिपती ह.भ.प.गणेश महाराज शास्त्री ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# पुण्यात एमपीएससी क्लास चालकांकडून मागितली जातेय खंडणी? संभाजी ब्रिगेडचा मोठा दावा, धनंजय मुंडेंच सांगितलं कनेक्शन

**पुणे । प्रतिनिधी**

पुण्यातील एमपीएससी तसेच यूपीएससी क्लास चालकांकडून खंडणी मागितल्याचा आरोप आज संभाजी ब्रिगेड यांच्या वतीने करण्यात आला आहे. स्पर्धा परीक्षा विद्यार्थी असोसिएशनचे अध्यक्ष महेश घरबुडे यांनी पुण्यातील अनेक क्लास चालकांकडून खंडणी मागितल्याचा आरोप या पत्रकार परिषदेतून करण्यात आला आहे. यावेळी संभाजी ब्रिगेडचे प्रदीप कणसे यांनी महेश घरबुडे यांचे काही व्हॉट्सप चॅट तसेच नेत्यांसोबतचे फोटो सुद्धा दाखवले. यासोबतच महाज्योतीचे प्रकल्प संचालक यांनी सुद्धा महेश घरबुडे यांच्या विरोधात नागपूर येथील बजाज नगर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.




नेमकं प्रकरण काय?

त्याचबरोबर या मोठ्या अधिकाऱ्याने तक्रार करून सुद्धा गुन्हा का दाखल होत नाही. महेश घरबुडे आणि लक्ष्मण हाके हे काल सामाजिक मंत्री अतुल सावे यांना काल (मंगळवारी) भेटले असल्याचं सुद्धा संभाजी ब्रिगेडने यावेळी पत्रकार परिषदेत सांगितलं आहे. या सर्व प्रकरणात महेश घरबुडे यांच्यावर खंडणीचा गुन्हा दाखल करावा, अशी मागणी आज संभाजी ब्रिगेडने केली आहे.

बहुजन समाजाचा सामाजिक, आर्थिक विकास व्हावा यासाठी काही संस्थांची निर्मिती करण्यात आली. सारथी, बार्टी आणि महाज्योती अशा संस्था आहेत, मात्र या संस्था चालकांना तसेच खासगी क्लासेसला चालकांकडून खंडणी मागितल्याच्या दोन तक्रारी दाखल झालेल्या आहेत. एक तक्रार १५ जानेवारीला मिळाली आहे, तर दुसरी तक्रार २० जानेवारीला मिळाली आहे. ही तक्रार महाज्योतीच्या विद्यार्थ्यांनी केली आहे. त्याच्या विद्यावेतनातील काही भाग मागितल्याची तक्रार त्यांनी दिलेली आहे. दुसरी तक्रार ही पुणे शहरातील महाज्योतीचे प्रकल्प संचालक यांनी सुद्धा महेश घरबुडे या व्यक्तिच्या विरोधात आहेत. या दोन तक्रारी मिळून देखील त्यावरती कोणतीही कारवाई करण्यात आलेली नाही, असा आरोप संभाजी ब्रिगेडने केला आहे.

शासकीय अधिकाऱ्यांनी महेश घरबुडे यांच्या विरोधात नागपूर येथील बजाज नगर पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. याबाबतचे फोटो आणि काही व्हॉट्सप चॅट तक्रारीत जोडले आहेत, इतक्या मोठ्या अधिकाऱ्यांनी तक्रार दाखल करून देखील त्या व्यक्तीवरती खंडणीचा गुन्हा दाखल केला जात नाही. तर त्यामागे कोणत्या शक्ती आहेत, हा व्यक्ती बाळासाहेब सानप आणि लक्ष्मण हाके यांच्यासोबत दिसलेला आहे. हे दोघे काल अतुल सावे यांना भेटले आहेत अशी आमच्याकडे माहिती आहे, हे दोघे महेश घरबुडे यांना वाचवण्याचा प्रयत्न करत आहेत असा दावा संभाजी ब्रिगेडचे प्रदीप कणसे यांनी केला आहे. या घटनेची सखोल चौकशी व्हावी अशी मागणी देखील त्यांनी यावेळी केली आहे.


### धनंजय मुंडेंच्या मेळाव्यात महेश घरबुडेचं भाषण

यावेळी बोलताना संभाजी ब्रिगेडचे प्रदीप कणसे यांनी सांगितलं की, धनंजय मुंडे यांचा पुण्यात बालगंधर्व या ठिकाणी मेळावा झाला होता.त्या मेळाव्यात महेश घरबुडे यांनी भाषण केलं होतं, स्पर्धा परिक्षेता अभ्यास करणारे जे परळीतील विद्यार्थी आहेत. त्यांना मतदानासाठी घेऊन जाण्याचं काम आणि जबाबदारी महेश घरबुडे वरती होती, अशी माहिती असल्याचंही कणसे यांनी यावेळी सांगितलं आहे. पोलिस तपासात सर्व माहिती पुढे आणतील, आम्ही केलेल्या आरोपांवर चौकशी व्हावी अशी मागणी देखील त्यांनी केली आहे.

# पुण्यातील 'या' बड्या हुक्का पार्लरवर छापा; पोलिसांची मोठी कारवाई

**पुणे । प्रतिनिधी**

कोरेगांव पार्कातील नागरिकांशी पोलीस आयुक्त अमितेशकुमार यांनी संवाद साधत त्यांच्या अडचणी ऐकूण कारवाईचे आश्वासन दिल्यानंतर कोरेगांव पार्कातील हुक्का पार्लर अन् बेकायदा दारू विक्रीवर पोलिसांनी छापेमारी केली आहे. लेन नं. ७ मधील पॉवर प्लाजा बिल्डिंगमधील हॉटेल पाल्मोकोवर ही कारवाई केली आहे. याप्रकरणी शिवा वासुदेव सरकार (वय ३२, रा. वडगाव शेरी), शाहीद निशार अहमद हुसेन (वय २१, रा. कोरेगाव पार्क) आणि नबिल मकसुद पिरजादे (वय ३०, रा. वारजे माळवाडी), इम्रान मोहम्मद गौस रेहाली (वय ३३, रा. वडगाव शेरी) यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे. पोलीस हवालदार प्रविण सुधीर पडवह यांनी कोरेगाव पार्क पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. ही कारवाई हॉटेल पाल्मोका येथे रविवारी सायंकाळी पावणे आठ वाजता करण्यात आली. पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी गुरुवारी कोरेगाव पार्क येथील लेन नं ५, ६, ७ मध्ये पायी पेट्रोलिंग करत नागरिकांशी संवाद साधला. अडचणी जाणून घेतल्या. नागरिकांना या अडचणी सोडविण्यासोबतच कारवाईचे देखील आश्वासन दिले. तेव्हा कोरेगाव पार्क पोलीस ठाण्याचे पथक लेन नंबर ७ मध्ये पेट्रोलिंग करताना हॉटेल पाल्मोको मध्ये हुक्का पार्लर सुरु असल्याची माहिती मिळाली. त्यानुसार पोलिसांनी छापा टाकला. त्यावेळी हॉटेलमधील टेबलवर हुक्का पॉट, तंबाखुजन्य अल फकेर व रॉयल स्मोकीन नावाचे हुक्का फ्लेवर असा २२ हजार ९६ रुपयांचा माल ग्राहकांना धुम्रपानासाठी अवैधरित्या विक्रीकरता ठेवलेला दिसून आला. त्याचप्रमाणे दारु विक्रीची कोणताही परवाना नसताना हॉटेलचे किचन रुममध्ये १३ हजार ५७५ रुपयांच्या दारुच्या बाटल्या आढळून आल्या. पोलीस उपनिरीक्षक नरेंद्र शिंदे अधिक तपास करीत आहेत.



बावधनमध्ये हुक्का पार्लरवर कारवाई

दरम्यान गेल्या काही दिवसाखाली बावधन पोलीस ठाण्याच्या हद्दीत म्हाळुंगे येथे बॉम्बे बिस्ट्रो रेस्ट्रो बार मध्ये सुरू असलेल्या हुक्का पार्लरवर बावधन पोलिसांनी कारवाई केली. यामध्ये ६,४०० किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. ही कारवाई रविवारी (दि. १२) रात्री करण्यात आली. सौम्यरंजन शिशिरकुमार बेहरा (वय २१, रा. वाकड), राहुल श्रीकांत कुलकर्णी (वय ३७, रा. भुगाव, पुणे) अशी गुन्हा दाखल झालेल्यांची नावे आहेत. याप्रकरणी पोलीस अंमलदार दत्तात्रय शिंदे यांनी बावधन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

# मुक्त विद्यापीठाची प्रवेश प्रक्रिया सुरु अर्जासाठी १५ फेब्रुवारीपर्यंत मुदत

**पुणे । प्रतिनिधी**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विविध विद्याशाखांतर्गत असलेल्या अभ्यासक्रमांच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेला सुरुवात झाली आहे. त्यासाठी विद्यार्थ्यांना १५ फेब्रुवारीपर्यंत ऑनलाइन अर्ज करता येणार आहे.




नवीन शैक्षणिक धोरण व विद्यापीठाने घेतलेल्या निर्णयानुसार कृषी शिक्षण अभ्यासक्रम्, बी. एड. (सेवांतर्गत), बी. एड. (विशेष) तसेच विज्ञान विद्याशाखेच्या शिक्षण अभ्यस क्रमांव्यतीरिक्त उर्वरित सर्व शिक्षण अभ्यासक्रमांसाठी ही प्रवेश प्रक्रिया असल्याची माहिती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. संजीव सोनवणे यांनी दिली.

विद्यापीठाच्या विविध ७१ अभ्यासक्रमासाठी ही प्रवेश प्रक्रिया विद्यापीठाकडून राबविली जात आहे. यामध्ये २७ प्रमाणपत्र अभ्यासक्रम, २० पदविका, ८ पदवी व १६ पदव्युत्तर अभ्यासक्रमांचा समावेश आहे. संपूर्ण प्रवेश प्रक्रिया ही फक्त ऑनलाइन पद्धतीने राबविली जाणार आहे. विद्यार्थ्यांना अर्जाच्या शुल्काचा भरणा देखील ऑनलाइन पद्धतीने करावा लागणार असल्याचे विद्यापीठाने स्पष्ट केले आहे.

नियमित पदवीसोबत दूरशिक्षणाद्वारे अधिकची पदवी विद्यार्थ्यांना घेता येणार असून, १५ फेब्रुवारीपर्यंत यासाठी अर्ज दाखल करता येणार आहे. विद्यार्थ्यांना ऑनलाइन पद्धतीने विद्यापीठाच्या संकेतस्थळावरुन अर्ज करता येणार असल्याची महिती विद्यापीठाचे कुलसचिव दिलीप भरड यांनी दिली. सविस्तर माहिती मुक्त विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

# पुण्यात 'जीबीएस' आजार वाढतोय; महापालिकेने चाचण्यांची सुविधा करावी - मंजूषा नागपूरे



**पुणे । प्रतिनिधी**

शहरात गुईलेन बॅरे सिंड्रोम (जीबीएस) आजाराच्या रूग्णांची संख्या वाढत आहे. प्रामुख्याने सिंहगड रस्ता परिसरात या साथीचे रूग्ण मोठया प्रमाणात आहेत. तर या आजाराच्या निदान होण्यासाठीच्या चाचण्या महाग आहेत. ही बाब लक्षात घेता संशयित रूग्णांच्या चाचण्यांचा खर्च महापालिकेने करावा, अशी मागणी माजी नगरसेविका मंजूषा नागपूरे यांनी केली आहे.

नागपूरे यांनी या मागणीचे पत्र महापालिकेच्या आरोग्य प्रमुख डॉ. निना बोरूडे यांना दिले आहे. तसेच, या आजाराच्या रूग्णांच्या उपचारासाठी महापालिकेने व्यवस्था करावी, अशी मागणीही नागपूरे यांनी केली आहे. गेल्या काही दिवसांपासून या साथीचे रूग्ण पुण्यात वाढत आहेत. तसेच, प्रामुख्याने सिंहगड रस्ता परिसरात सर्वाधिक संशयित रूग्ण असून दूषीत पाण्यामुळे हा आजार पसरतो. ही बाब लक्षात घेऊन त्यानुसार प्रतिबंधात्मक उपाय योजना करण्याची मागणीही नागपूरे यांनी केली आहे.

# पोलीस मित्र संघटना दिनदर्शिका २०२५चे प्रकाशन चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते

**पुणे । प्रतिनिधी**

महाराष्ट्र राज्य पोलीस मित्र संघटनेच्या दिनदर्शिका २०२५ चा प्रकाशन समारंभ पार पडला. या प्रसंगी महाराष्ट्र राज्याचे उच्च व तंत्रशिक्षण तसेच संसदीय कार्यमंत्री चंद्रकांत पाटील यांच्या हस्ते दिनदर्शिकेचे प्रकाशन करण्यात आले.



यावेळी बोलताना चंद्रकांत पाटील यांनी पोलीस मित्र संघटनेच्या कार्याचे कौतुक केले. ते म्हणाले, पोलीस मित्र संघटना पोलिसांसाठी तसेच सामान्य नागरिकांसाठी महत्त्वाचे कार्य करत आहे. पोलिस व नागरीक यांच्यातील संवाद आणि सहकार्य वाढविण्यात ही संघटना मोलाचे योगदान देत आहे. यासाठी शासन स्तरावर सर्वतोपरी सहकार्य दिले जाईल.

पोलीस मित्र संघटनेची दिनदर्शिका राज्यातील सर्व पोलीस ठाण्यांमध्ये तसेच नागरिकांपर्यंत पोहोचविण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

या कार्यक्रमास पोलीस मित्र संघटनेचे अध्यक्ष राजेंद्र कपोते, संघटनेचे पदाधिकारी संदीप खर्डेकर, मनीष सोनिग्रा, चैतन्य जगताप, तसेच अनेक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

संघटनेच्या पुढील उपक्रमांबाबत यावेळी अधिक माहिती देण्यात आली. तसेच जनतेचे पाठबळ व पोलिसांचे सहकार्य मिळवून समाजहिताचे उपक्रम अधिक प्रभावीपणे राबविण्याचा संकल्प व्यक्त करण्यात आला.

# पुणे पोलिसांची मोठी कारवाई; चोरी करुन पळून गेलेल्या चोरट्याला पकडले

**पुणे । प्रतिनिधी**

चोरी केल्यानंतर पळून गेलेल्या चोरट्याला शिवाजीनगर पोलिसांनी चार महिन्यांनी जेरबंद केले आहे. तेव्हा त्याने चोरलेले पैसे बँक खात्यात ठेवले अन् त्यातले काही पैसे खर्च देखील केले. दरम्यान, शिवाजीनगर पोलिसांनी ७ लाख २० हजार रुपये बँकेत गोठवले. तसेच एक लाख रुपयांचा आय फोन जप्त करण्यात आला आहे. डेबज्योती करुणामय डे (वय २८, रा. खरागुण, पश्चिम बंगाल) असे अटक केलेल्याचे नाव आहे. डेबज्योती डे याने एका घरात शिरुन ७ लाख २० हजार रुपये व आय फोन चोरी केला होता. पोलिसांनी त्याचा शोध घेऊन त्याला पकडले. तसेच चोरलेली सर्व रक्कम जप्त केली आहे.

पोलीसांकडून शहरातील पाहिजे व फरार आरोपींवर पाळत ठेलली जात आहे. नव्या वर्षाच्या १५ दिवसात २०२३ व २०२४ मधील ७ गुन्ह्यांची उकल केली आहे. २०२३ मध्ये जबरी चोरी करुन फरार असलेला उसामा शफिक शेख (वय २३, रा. सैय्यदनगर, हडपसर) याला अटक करुन हिसकावुन नेलेला ४५ हजार



रुपयांचा मोबाईल केला आहे. २०२३ मध्ये चांगल्या परताव्याचे आमिष दाखवून गुंतवणुक करण्यास प्रवृत्त करुन ५ लाख रुपयांची फसवणूक करणार्या आशिष रामदास मानकर (वय ४८, रा. वाघोली) याला अटक केली.

वस्तू खरेदी करताना पाच हजार रुपयांची फसवणूक करण्यात आली होती. ही रक्कम बँकेस गोठविण्यास सांगून ती फिर्यादीला बँकेकडून परत करण्यात आली आहे. तसेच अर्जदाराची ऑनलाईन फसवणूक झाली होती. त्याबाबत त्वरील संबंधित बँकांना पत्रव्यवहार करुन अर्जदाराचे २८ हजार रुपये परत मिळवून दिले. शिवाजीनगर परिसरात हरविलेले मोबाईल तांत्रिक विश्लेषण करुन एकूण १० मोबाईल व १ लॅपटॉप परत मिळवून दिले.

ही कामगिरी पोलीस उपायुक्त संदीपसिंग गिल, सहायक पोलीस निरीक्षक साईनाथ ठोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली वरिष्ठ निरीक्षक चंद्रशेखर सावंत, पोलीस निरीक्षक गुन्हे चंद्रकांत सूर्यवंशी यांच्या नेतृत्वाखाली सहायक पोलीस निरीक्षक के बी डाबेराव, पोलीस अंमलदार नलिनी क्षीरसागर, आदेश चलवादी, तेजस चोपडे, अर्जुन कढाळकर, रुचिका जमदाडे यांनी केली आहे.

औंध भागात घरफोडी

औंध भागातील सानेवाडी ओझन मॉल परिसरातील एका सोसायटीतल बंद फ्लॅट फोडून चोरट्यांनी ३ लाख ९० हजारांचा ऐवज चोरून नेला आहे. याप्रकरणी चतु:श्रृंगी पोलिसांत ७५ वर्षीय ज्येष्ठाने तक्रार दिली आहे. सोमवारी रात्री हा प्रकार समोर आला आहे. तक्रारदार रविवारी सायंकाळी घराला कुलूप लावून गेले असता चोरट्यांनी त्यांच्या घराचे कुलूप उचकटून आत प्रवेश केला. घरातील रोकड व दागिने असा ३ लाख ९० हजारांचा ऐवज चोरला.

# रोकड लुटण्याचा प्रयत्न करणारे तीन अल्पवयीन ताब्यात; भारती विद्यापीठ पोलिसांची मोठी कारवाई

**पुणे । प्रतिनिधी**

कात्रज भागातील पेट्रोल पंपावरील व्यवस्थापकाला मारहाण करुन साडेतीन लाखांची रोकड लुटण्याचा प्रयत्न करणाऱ्या तीन अल्पवयीनांना भारती विद्यापीठ पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. अल्पवयीनांनी केलेल्या मारहाणीत व्यवस्थापक जखमी झाला होता. याप्रकरणी भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. याबाबत पेट्रोल पंपावरील व्यवस्थापकाने तक्रार दिली होती. त्यानूसार, तीन अल्पवयीन मुलांना ताब्यात घेतले आहे.

वरिष्ठ निरीक्षक सावळाराम साळगावकर, गुन्हे शाखेच्या पोलीस निरीक्षक संगीता देवकाते, राहुलकुमार खिलारे यांच्या मार्गदर्शनाखाली उपनिरीक्षक नीलेश मोकाशी, मंगेश पवार, सचिन सरपाले, निलेश खैरमोडे, सचिन गाडे, मितेश चोरमोले, अभिनय चौधरी, सागर बोरगे यांनी ही कारवाई केली.

तक्रारदार तरुण पेट्रोल पंपावर व्यवस्थापक आहे. १३ जानेवारी रोजी दुपारी पेट्रोल पंपावर जमा झालेली तीन लाख ४६ हजारांची रोकड घेऊन तो बँकेत भरणा करण्यासाठी निघाला होता. त्यावेळी कात्रज-कोंढवा रस्त्यावर त्याला अडवून अल्पवयीनांनी दांडक्याने मारहाण केली. त्याच्याकडील रोकड असलेली पिशवी चोरुन नेण्याचा प्रयत्न केला. त्याने अल्पवयीनांना विरोध केला. त्यानंतर अल्पवयीन पसार झाले. जखमी अवस्थेतील व्यवस्थापकाने पोलिसांकडे तक्रार दिली आहे. पोलीस कर्मचारी महेश बारावकर,



चेतन गोरे यांनी कात्रज-कोंढवा रस्त्यावरील सीसीटीव्ही चित्रीकरण तपासले. तपासात मिळालेल्या माहितीनुसार अल्पवयीनांना ताब्यात घेण्यात आले. चौकशीत त्यांनी गुन्हा केल्याची कबुली दिली आहे.

कारची काच फोडून चोरी

राज्यात चोरट्यांनी धुमाकूळ घातला आहे. राज्यातील वेगवेगळ्या भागातून चोरीच्या घटना उघडकीस येत असतात. अशातचं आता विमाननगर परिसरात रस्त्याच्या कडेला लावलेल्या कारची काच फोडून चोरट्यांनी तब्बल दहा लाख ५१ हजार रुपयांची रोकड चोरुन नेल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. व्यावसायिकाने याबाबत तक्रार दिली असून, या चोरट्यांनी पाळत ठेवून चोरी केल्याचा संशय आहे. याप्रकरणी नितेशकुमार राजकुमार शहा (वय ३४, रा. चारकोप, कांदिवली, मुंबई) यांनी विमानतळ पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे. त्यानूसार चोरट्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पोलिसांच्या माहितीनुसार, शहा व्यावसायिक आहेत. ते कामानिमित्त मुंबईहून विमाननगर येथे आले होते. तेव्हा विमाननगर भागातील वाटिका सोसायटीसमोर त्यांनी रविवारी रात्री कार लावली. नंतर ते कामाच्या ठिकाणी गेले. त्यावेळी चोरट्यांनी कारची काच फोडली. कारमधील पिशवीत ठेवलेली साडेदहा लाखांची रोकड चोरुन पोबारा केला. घटना लक्षात येताच त्यांनी पोलिसांकडे धाव घेऊन तक्रार दिली. अधिक तपास उपनिरीक्षक रवींद्र ढावरे करत आहेत. हडपसर भागात दोन कारच्या काचा फोडून चोरट्यांनी रोकड, दागिने चोरुन नेल्याची घटना नुकतीच घडली होती.

# मित्राच्या हातून दुसऱ्या मित्रावर गोळी झाडली; रुग्णालयात दाखल होताच दोघांचे बिंग फुटल

**पुणे । प्रतिनिधी**

बेकायदेशीर गावठी पिस्तूल हाताळताना मित्राच्या हातून दुसऱ्या मित्रावर गोळी झाडली गेली. मात्र रुग्णालयात वैद्यकीय उपचारासाठी दाखल झाल्यावर ही घटना लपविण्याचा प्रयत्न केला. मात्र वैद्यकीय तज्ञांनी पोलिसांना दिलेल्या माहितीमुळे दोघांचेही बिंग फुटले. याप्रकरणी गोळी झाडणाऱ्यावर कोंढवा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनूसार, ही घटना शनिवारी रात्री कोंढवा येथे घडली. घटनेत जखमी झालेला प्रदीप सावंत हा उपचारासाठी आंबेगावातील विल्वर जुबली रुग्णालयात दाखल झाला. तेथे त्याने अंगाला गोळी लागल्याची बाब डॉक्टरांपासून लपविण्याचा प्रयत्न केला. मात्र उपचारादरम्यान गोळी लागल्याचे उघड झाले. तेथून आंबेगाव पोलिसांना माहिती देण्यात आली.

पोलिसांनी सावंतकडे चौकशी केली असता, त्याने सांगितले की, त्याचा मित्र अनिल चव्हाण हा बेकायदेशीर आणि विनापरवाना गावठी पिस्तूल हाताळत होता. त्यावेळी गोळी सुटून खांद्याला लागून दुखापत झाली. यानंतर अनिल चव्हाण याच्यावर गुन्हा दाखल करून त्याला अटक करण्यात आली.

# पुण्यात दूर्मीळ GBS रोगाचे संकट; शरद पवारांकडून राज्य सरकारला सूचना, दाहकता लक्षात घ्या

**मुंबई । प्रतिनिधी**

धकाधकीच्या जीवनात आरोग्याची काळजी घेणे महत्त्वाचे आहे हे आपल्याला कोरोनासारख्या गंभीर महामारीने दाखवून दिले आहे. मात्र, अनेकदा नवनवीन रोग व आजारांची साथ आल्यानंतर नागरिकांमध्ये भीतीचं वातावरण निर्माण होतं. सध्या पुणे शहरात जीबीएस नावाच्या आजाराने डोकं वर काढलं असून पुणे महापालिकेनेही याची दखल घेत समिती स्थापन केली आहे. पुणे शहरात 'गुलेन बॅरी सिंड्रोम' या न्यूरोलॉजिकल आजाराचे संशयित रूग्ण आढळून आले आहेत. पुणे महानगरपालिका हद्दीतील ६ खासगी रुग्णालयांमध्ये २४ संशयित रुग्ण आढळून आल्याची माहिती आहे. त्यापैकी ८ रुग्णांवरती अतिदक्षता विभागामध्ये उपचार सुरू आहेत. तर त्यापैकी २ रुग्ण व्हेंटिलेटरवर असल्याची माहिती आरोग्य विभागाकडून देण्यात आली आहे. आता, या आजाराबाबत शरद पवार यांनी ट्विट करुन संबंधित आजाराबाबत राज्य सरकार व महापालिकेन गंभीर दखल घेण्याची सूचना व्यक्त केली आहे.

जीबीएस रोगाचे पुण्यात आढळून आलेल्या




२४ संशयित रुग्णांपैकी सर्वांत कमी वयाचा रुग्ण २ वर्षांचा आहे, तर सर्वाधिक वयाचा रुग्ण ६८ वर्षांचा असल्याची माहिती आहे. पुणे महापालिका प्रशासनाने या आजाराची दखल घेत कमिटी स्थापन केली असून यासाठी उपाययोजना आखल्या जात आहेत. त्यातच, राष्ट्रवादी काँग्रेसचे सर्वेसर्वा खासदार शरद पवार यांनीही चिंता व्यक्त केली आहे. तसेच, या आजाराचे संकट ओळखून योग्य ती खबरादारी घेण्याचंही पुणे महापालिका व राज्य सरकारला सूचवलं आहे.

'जीबीएस' अर्थात गुलियन बॅरी सिंड्रोम या आजाराने पुणे शहर आणि शहरालगत काही भाग विशेषतः सिंहगड रस्त्यावरील पुणे मनपामधील नवी समाविष्ट गावांमध्ये नागरीक बाधित झाल्याचे निदर्शनात आले आहे. या दुर्मीळ आजाराची दाहकता लक्षात घेता आणि नागरीकांमध्ये वाढलेले भीतीचे वातावरण ही एक चिंतेची आणि गंभीर बाब म्हणावी लागेल. दूषित पाण्यातून या आजाराचा प्रदुर्भाव होण्याची शक्यता तज्ञांकडून वर्तवली जात आहे. त्यामुळे पुणे महापालिका प्रशासन व राज्य सरकारने ही परिस्थिती आटोक्यात आणण्याकरीता योग्य ती खबरदारी घ्यावी. संभाव्य संकटाचे अतिदक्षताप्रूवक योग्य नियोजनातून निराकरण करण्याची भूमिका घ्यावी, अशी अपेक्षा शरद पवार यांनी व्यक्त केली आहे. यासंदर्भात त्यांनी ट्विट करुन सूचना केल्या आहेत.

'जीबीएस' अर्थात गुलियन बॅरी सिंड्रोम या आजाराने पुणे शहर आणि शहरालगत काही भाग विशेषतः सिंहगड रस्त्यावरील पुणे मनपामधील नवी समाविष्ट गावांमध्ये नागरीक बाधित झाल्याचे निदर्शनात आले आहे. या दुर्मीळ आजाराची दाहकता लक्षात घेता आणि नागरीकांमध्ये वाढलेले भीतीचे वातावरण ही एक चिंतेची आणि

काय आहे गुलेन बॅरी सिंड्रोम

'गुलेन बॅरी सिंड्रोम' (त्र्त्र्ीळश्रश्ररळप-इरीीश डूपवीाश) या आजाराने बाधित रुग्णांची प्रतिकारशक्ती मज्जातंतूवर आघात करते. हाता-पायांमधील ताकद कमी होणे आणि मुंग्या येणे, गिळण्यास आणि बोलण्यास त्रास होणे, धाप लागणे, श्वास घेण्यास त्रास होणे अशी लक्षणे या आजारामध्ये दिसून येत आहेत. संशयित रुग्णांपैकी आठ रुग्णांचे रक्त आणि लघवीचे नमुने राष्ट्रीय विषाणू विज्ञान संस्थेकडे तपासणीसाठी पाठवण्यात आल्याची माहिती आहे.